|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ५० सोमवार दि. ०४ डिसेंबर २०२३ ते रविवार दि. १० डिसेंबर २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## प्रेयसीकडून विश्वासघात झाला बेसावध प्रियकराचा गेम केला

भंडारा/क्राईम रिपोर्टर




आजकालची प्रेमप्रकरणे अळवावरच्या पाण्याच्या थेंबा सारखी असतात. प्रियकर किंवा प्रेयसीने काही दिवस मौजमजा करायची, पण नंतर मन भरले कि ब्रेकअप करून दुसरा किंवा दुसरी गाठायची. भंडाऱ्यात अशाच एका घटनेत पहिला प्रियकर असताना एका तरुणीने दुसऱ्याला पटवले आणि त्याच्यामार्फत पहिल्या प्रियकराला एका पिकनिक ...पान ६ वर

# अध्यात्मिक केंद्रात बाईची कामलीला सुरु झाली २० कोटींची खंडणी मागताच विश्वस्तांची अब्रु गेली

नाशिक/क्राईम रिपोर्टर

भारतीय संस्कृतीत स्त्रीला साक्षात देवता मानले जाते. त्यामुळे या देवतेची पूजा केली जाते. संस्कृती आणि सामाजिक मर्यादा यांचे पालन करणारी भारतीय नारी तिच्या कर्तुत्वाने प्रत्येक पिढीसाठी आदर्श ठरलेली आहे. पण आज मात्र परिस्थिती बदललेली आहे. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत असली तरी तिच्यात पुरुषा इतकाच स्वार्थ आणि इर्षा निर्माण झालेली आहे. त्यामुळे आपल्या सौंदर्याचा वापर करून आजची स्त्री कोणालाही आपल्या नादाला लावून त्याला बरबाद करू शकते. पूर्वी गुन्हेगारीच्या क्षेत्रात फक्त पुरुषांचेच नाव होते, पण आज मात्र या क्षेत्रात महिलाही मागे राहिलेल्या नाहीत. फसवणूक आणि ब्लॅकमेलिंगपासून खुनासारख्या गंभीर गुन्ह्यात सुद्धा महिला मागे राहिलेल्या नाहीत आणि सर्वच क्षेत्रात त्यांनी शिरकाव केलेला आहे. अगदी धार्मिक क्षेत्रातही काही हुशार महिलांनी घुसखोरी करून त्याला पैसे कमावण्याचे माध्यम बनवले आहे. परिणामी त्या क्षेत्राचे पावित्र्य नष्ट होत आहे. पूर्वी बुवा तेथे बाया म्हटले जायचे, आज मात्र भोंदू बुवा तिथे चालबाज बाया असे म्हणण्याची पाळी आली आहे. नाशिकच्या दिंडोरी बिज गुणन केंद्रात कृषी सहाय्यक पदावर काम करणाऱ्या सारिका सोनावणे या अधिकारी महिलेकडे स्वामी समर्थ आध्यात्मिक सेवा केंद्राची जबाबदारी येताच तिने या सेवा केंद्राचा विकास करण्याऐवजी तिथे संकल्प सिद्धी नावाची पैसे डबल करणारी संस्था उघडून सेवा केंद्रात अध्यात्मासाठी येणाऱ्या सेवेकऱ्यांना चुना लावला. ती एवढ्यावरच थांबली नाही तर तिने सेवा केंद्राचे विश्वस्त निंब शिरसाट यांच्याशी अनैतिक संबंध ठेऊन दोघांमधील लैंगिक संबंधाच्या व्हिडिओ क्लिप बनवल्या आणि त्या सार्वजनिक करण्याची धमकी देऊन विश्वस्तांकडे २० कोटींची खंडणी मागितली. तिचा हा भयंक प्रताप बघून संपूर्ण नाशिक जिल्हा हादरला आहे. मात्र विश्वस्तांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिला सपळा रचून अटक केली.





आरोपी सारिका सोनावणे



आरोपी मुलगा मोहित

एखादी महिला तुम्हाला २० कोटी रुपयांची खंडणी मागते, पैसे द्या नाहीतर तुमचा अश्लिल व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देते. असे कसे शक्य आहे? हा साधा प्रश्न आहे. ती महिला काहीही म्हणत असली तरी तुम्ही तिला एक कोटी पाच लाख रुपये देता नंतर दहा लाख रुपयांची खंडणी घेतांना ती पकडले जाते. हा सारा प्रकार नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी येथील स्वामी समर्थ अध्यात्मिक सेवा केंद्रातील सेवेकरी महिला आणि विश्वस्तांशी संबंधीत आहे. एखादी महिला तुमच्या गळ्यात पडून तुमच्यासोबत राजीखुशीने संबंध ठेवत असेल. काही ठराविक कालावधीनंतर या संबंधाची वसुली करायची किंमत वीस कोटी मागितली जाऊ शकते का? असे का व्हावे? उत्तर सोपे आहे. तिने लाज सोडली, कदाचीत तुम्ही लाज सोडली असेल. दोघांनी बाहेरख्यालीपणा केला असू शकतो. तिने गुपचूप व्हिडिओ तयार केला. हा व्हिडीओ कितपत खरा आहे हा पोलिस तपासाचा भाग आहे. तुम्ही एक कोटी पाच लाख रुपये तिला देतात याचा अर्थ तुमच्या आजवर कमावलेल्या इज्जतीची किंमत मात्र २० काय ५० किंवा १०० कोटीहून जास्तच. ...पान २ वर

## गुंतवणूकदारांची फसवणूक करून कर्जबाजारी झाला उद्योजकाने नैराश्यातून पत्नी आणि मुलाचा खून केला

कल्याण/क्राईम रिपोर्टर



गुंतवणुकदारांना अधिक परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या अनेक कंपन्यांना टाळे लागले आहे. तर त्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून फसलेल्या कित्येक गुंतवणूकदरांवर आत्महत्या करण्याची पाळी आली आहे. पण कल्याणमध्ये मात्र वेगळेच प्रकरण घडले आहे. दीपक गायकवाड या उद्योजकाने निधी रिसर्च फार्म नावाची फायनान्स कंपनी खोलून ६ ते ८ टक्के परताव्याचे आमिष दाखवले. पण त्यात अपयश येऊन तो कर्जबाजारी होताच त्याने पत्नी व मुलाची हत्या करून आत्महत्येचा प्रयत्न केला. पण त्यात अपयश आल्याने फरारी झाला होता. मात्र पोलिसांनी त्याला संभाजीनगर येथून अटक केली आहे.

कर्जबाजारी दीपक गायकवाड पत्नीसह आपल्या चिमूरड्या आदिराजची हत्या करून फरार झाला होता. या आरोपीला पोलिसांनी संभाजीनगरमधून अटक केली आहे. आदिराज आणि अश्विनी यांच्या वाढदिवसाच्या काही तास आधीच त्यांची हत्या झाल्याने नातेवाइकांनी आक्रोश केला. त्याने हत्या का व कशी केली? याचा खुलासा तपासात उघड होणार आहे. मात्र, त्याच्या या कृत्यानंतर त्याच्या फायनान्स कंपनीच्या कार्यालयाबाहेर गुंतवणूकदारांनी गर्दी केली होती. उच्चभ्रू आयुष्य जगण्याच्या जिद्दीने पेटलेल्या दीपक याने कल्याण शहरात मध्यवर्ती भागात निधी रिसर्च फर्म फायनाशियल कन्सल्टट कंपनी थाटली होती. गुंतवणूकदारांना ६ ते ८ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवत करोडो रुपयांची गुंतवणूक करून घेतली होती. सुरुवातीला गुंतवणूकदारांना चांगला परतावा त्याने दिला. मात्र, त्यानंतर त्याचा व्यवसाय बुडीत निघाल्याने गुतवणूकदारांनी पैशांसाठी तगादा लावला होता. कल्याणात खेळण्याची चार ते पाच दुकाने थाटून बसलेल्या दीपककडे १०० कामगार काम करत होते. मात्र मागील चार ते पाच महिन्यापासून या कामगारांना त्याने पगार दिला नव्हता. कर्जबाजारी झालेल्या दीपक याने शुक्रवारी १ डिसेंबर रोजी टोकाचे पाऊल उचलत पत्नी आणि मुलाच्या जेवणात विष घातले. यात चिमूरड्याने दम तोडला तर पत्नी अत्यवस्थ झाली पण निर्दयी दीपक याने उशीने तिचे तोंड दाबून तिची हत्या केली. तर ७ वर्षांच्या चिमुकल्या आदिराजने त्या आधीच जगाचा निरोप घेतला होता. पत्नी मुलाचा जीव घेतल्यानंतर दीपक याने पंख्याला साडी बांधून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने हा नाद सोडला आणि तो पळून गेला. आपल्या चारचाकी गाडीने संभाजीनगरच्या दिशेने जाताना त्याने आपल्या भावाला आणि त्यानंतर पत्नीच्या भावाला फोन करून आपण हत्या केल्याचे सांगितले. यानंतर पोलिसांनी मोबाइलच्या लोकेशनवरून ...पान ६ वर

## फ्रॅक्चर केल्याने सुडाने पेटला मित्रानेच मित्राचा बदला घेतला

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



मयत शुभम

किती जरी जिवलग मित्र असला तरी कोणत्या ना कोणत्या कारणावरून मैत्रीत दुरावा येतो आणि जेंव्हा मैत्रीत दुरावा येतो तेंव्हा मैत्रीचे रुपांतर दुष्मनीत होते. तीन मित्रांचे असेच झाले होते. एकदा दारूच्या नशेत शुभम पाटील याला इतकी बेदम मारहाण केली होती कि त्यात तो फ्रॅक्चर झाला होता. मात्र याच कारणावरून त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण झाली. मात्र त्याने सूड घेण्यासाठी अत्यंत शांत डोक्याने प्लान केला. फ्रॅक्चर करणाऱ्या त्या मित्राशी पुन्हा चांगले संबंध जुळवले आणि एके दिवशी दारूच्या पार्टीसाठी बोलावून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



हल्ली शुभम पाटील हा काही ही कामधंदा करीत नव्हता. मनात येईल त्यावेळी कामाला जाणे दारूसाठी आणि चैनी साठी पैसे जमा करणे एवढेच त्याचे काम होते. त्यामुळे त्याच्या घरच्या लोकाशी त्याचे पटत नव्हते. त्याच्याबरोबर ही तो घरात भांडणे काढत असल्याने ...पान २ वर

## मालकाचा ट्रॅक्टर नोकराने चोरून नेला अडवणाऱ्या रखवालदाराचा खून केला



जळगाव/क्राईम रिपोर्टर

या जगात खाल्ल्या घरचे वासे मोजणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ज्याने आपल्याला रोजी रोटी दिली त्याच्याशीच बेईमानी करणारे नोकर आजकाल पावलो पावली बघायला मिळतात. जळगावच्या बिलवाडीमध्ये सालदार म्हणून काम करणाऱ्या एका इसमाने आपल्या मेव्हण्याच्या मदतीने चक्क आपल्या मालकाचा ट्रक्टर पळवला. यावेळी त्याला रोखण्यासाठी पुढे आलेल्या रखवालदाराची त्यांनी हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.







या जगात गद्दारांची आणी चोरांची कमतरता नाही. ज्या मालकाकडे आपण काम करतो त्याच्याचकडे चोरी करणारे गद्दार नोकर देखील असतात. मात्र चोर आणि गुन्हेगार ...पान २ वर

## प्रेयसीच्या आई-वडिलांना जाळून पळाला बावीस वर्षांनी आरोपी पोलिसांना मिळाला



मुंबई/एस.कुमार

प्रेमात पडलेला तरुण कशाचीही परवा करीत नाही. आपले प्रेम आणि प्रेयसी यांच्यासाठी कोणत्याही थराला जायची त्याची तयारी असते. त्याच बरोबर आपण जिच्यावर मनापासून प्रेम करतो ती आपल्याशिवाय इतर कोणाची होऊ द्यायची नाही हेच त्याने ठरवलेले असते. अशावेळी जर तिने विश्वाघात केला तर तो तिचा जीव घेतो किंवा तिच्या घरच्यांनी विरोध केला तर त्यांचा जीव घेतो. मुंबईच्या कांदिवलीत २२ वर्षांपूर्वी प्रेमाला विरोध करणाऱ्या प्रेयसीच्या आई-वडिलांना जीवंत जाळून मारणाऱ्या एका माथेफिरू प्रेमवीराला पोलिसांनी तब्बल २२ वर्षांनी अटक केली.

२००१मध्ये कांदिवलीमध्ये झालेल्या डबल मर्डर प्रकरणात वॉन्टेड आरोपीला २२ वर्षांनी गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली आहे. कांदीवली (पूर्व) क्रांतीनगर येथील हनुमान चाळीत रेहना (काल्पनीक नाव) ही तरुणी आपल्या आईवडिलांसह राहत होती. ती दिसायला देखणी, सूदौल बांध्याची आणि अप्रतिम सौंदर्य ...पान ६ वर

## धाग्यामुळे मृतदेहाची ओळख पटली शुल्लक वादात आयुष्याची दोरी तुटली



मयत लवेश माळी



वसई/क्राईम रिपोर्टर

आजकाल शुल्लक कारणावरून माणसाला इतका राग येतो कि तो एखाद्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाही. रिक्षा मालकाने ज्याला रिक्षा चालवायला दिली होती त्याच्या हातून केवळ रिक्षाची काच फुटली यावरून झालेल्या पैशांच्या वादात रिक्षा मालकाने त्याचाच मित्र असलेल्या लवेश माळी याची हत्या केली व मृतदेह फेकून दिला. मात्र मृतदेहाच्या पायाला बांधलेल्या एका धाग्यामुळे मृतदेहाची ओळख पटली आणि पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली.

महामार्गाजवळ सापडलेल्या मृतदेहाच्या हत्येचा उलगडा गुन्हे शाखा २ च्या पथकाने केवळ पायात बांधलेल्या एका धाग्यावरून केला आहे. या प्रकरणी एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. लवेश माळी (२३) असे मृत तरुणाचे नाव असून त्याच्याच मित्रांनी क्षुल्लक वादातून त्याची हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. २२ नोव्हेंबर रोजी मुंबई अहमदाबाद महामार्गाविजवळ बापाणे पूलाजवळ असलेल्या झुडपात पोलिसांना एक कुजलेला मानवी सांगाडा सापडला होता. त्याची काही ओळख पटत नव्हती. डोक्यावर वार करून हत्या केल्याचे शवविच्छेदन ...पान २ वर

## दारुडा बाप डोकेदुखी ठरला मुलानेच त्याचा काटा काढला



सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

दारुडा माणूस हा संपूर्ण कुटुंबासाठी डोकेदुःखी ठरलेला असतो. कारण एक तर तो कामधंदा करीत नाही. उलट दारूसाठी घरातल्या लोकांना सतावत असतो. त्याच्यामुळे घरातली शांतता आणि नातेसंबंध खराब झालेले असतात. त्यामुळे हा रोजचा त्रास कायमचा संपवण्यासाठी कुटुंबातील लोकच टोकाचा निर्णय घेतात आणि त्यातून काहीही भयंकर घडू शकते. माळशिरस मधील कोंडबावी हा सुद्धा असाच होता. रोज दारू पिऊन कुटुंबातील लोकांना त्रास द्यायचा. मुलानेच बापाचा काटा काढला....पान ६ वर

## दारूची नशा त्यांच्या डोक्यात गेली दोन मित्रांनी तिसऱ्याची हत्या केली





मयत अनिल

सातारा/क्राईम रिपोर्टर

दारूड्यांच्या पार्टीत दारूची नशा चढली कि मग पिणाऱ्यांचा स्वतःवर कंट्रोल राहत नाही. अशावेळी एकमेकांची उणीदुणी काढली जाते. पूर्वीचे वाद उकरून काढले जातात आणि त्यातूनच हाणामारीला सुरुवात होते आणि मित्र म्हणून जे दारू पिण्यासाठी बसलेले असतात ते एकमेकांचे शत्रू बनून एकमेकांना शिवीगाळ करतात. मारहाण करतात. कधी कधी अशा भांडणातून मुडदे पडतात. वाई तालुक्यातील भुईजमध्ये अशाच दारूच्या पार्टीत झालेल्या वादातून दोन मित्रांनी तिसऱ्याचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

वाई तालुक्यातील भुईज येथील मातंग वस्तीत अनिल रामदेव कुचेकर हा आपल्या पत्नी भाऊ मुले आणि आई वडिलासह राहयला आहे. तो वाई येथील मार्केटमध्ये हमालीचे काम करीत असल्याने त्याला दारू पिण्याची सवय होती. तो गावाकडे येताना रोज रात्री दारू पिऊनच येत होता. तो हमालीचे करीत असलेले काम हे कष्टाचे आणि ताकदीचे ...पान ६ वर

04 TO 10 DECEMBER 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 12/2/2023 10:42 PM Page 1



**पान १ वरून...**

## अध्यात्मिक केंद्रात बाईची कामलीला...

म्हणून आपल्या लौकिक, सामाजिक, अध्यात्मिक मान- सन्मान प्रतिष्ठेला धक्का लागू नये म्हणून इज्जत जपणारी माणसे पैसे देतात. काही लाख, काही कोटी सुद्धा देतात. इज्जत आणि इभ्रत जपणाऱ्या माणसाला असेच जगावे लागते. मात्र धटींग, दादा लोक अशा पद्धतीने ब्लॅकमेल करु पाहणाऱ्यांचा प्रसंगी खून पाडतात. कोणी गळा चिरतात तर कुणी फासावर लटकवतात. हाच गुन्हेगारी जगाचा अलिखीत नियम आहे. चारित्र्यासह कुटुंबात इज्जतीने राहणारा नाईलाजाने खंडणी देतो आणि डोक्यावरुन पाणी गेल्यास पोलिसात तक्रार दाखल करतो. नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी येथील स्वामी समर्थ अध्यात्मिक सेवा केंद्राच्या विश्वस्तांचे आणि त्या महिलेचे काय प्रकरण आहे? ते बघूया. निंबा मोतीराम शिरसाठ हे नाशिकच्या दिंडोरी येथील स्वामी समर्थ अध्यात्मिक सेवा केंद्राचे विश्वस्त असल्याचे सांगितले जाते. सारिका सोनवणे ही महिला नाशिक जिल्ह्याच्या निफाड येथील बिज गुणन केंद्रात कृषी सहायक पदावर आहे. निंबा शिरसाठ आणी सारिका सोनवणे हे दोघे सन २०१४-२०१५ पासून एकमेकांच्या संपर्कात आल्याचे म्हटले जाते. दोघेही नाशिकच्या देवळा तालुक्यातील रहिवासी आहेत. दोघे एकाच तालुक्यातील रहिवासी असल्यामुळे दोघांना एकमेकांबद्दल आत्मियता निर्माण झाली. त्यातून दोघांमधे जवळीक वाढत गेली. कृषी अधिकारी असलेल्या सारिका सोनवणे या महिलेवर सुरुवातीला स्वामी समर्थ अध्यात्मिक सेवा केंद्राच्या सिडको परिसरातील केंद्राची जबाबदारी देण्यात आली. नंतर हळूहळू कळवण, सटाणा, मालेगाव आणि देवळा परिसरातील सुमारे ४५ समर्थ केंद्रांची जबाबदारी देण्यात आली. सुमारे ४५ समर्थ केंद्रांची जबाबदारी आल्यानंतर या सर्व केंद्रातील सेवेकरी साहजीकच सारिका सोनवणे या महिलेच्या अख्यतारीत आले. या सर्व सेवेकऱ्यांवर तिने आर्थिक लाभाचे अर्थात मोहाचे जाळे फेकण्यास सुरुवात केली. सारिका सोनवणे हिने संकल्प सिद्धी नावाची कंपनी तुमचे पैसे डबल करून देईल असे सेवेकऱ्यांना सांगून त्यांच्याकडून पैसे जमा करण्यास सुरुवात केली. पैसे डबल होण्याच्या मोहात पडलेल्या सेवेकऱ्यांनी सारिका सोनवणे या महिलेकडे लाखो रुपये जमा केल्याचे म्हटले जाते. मात्र सेवेकऱ्यांकडून घेतलेले पैसे तिने परत केले नाही अशी ओरड आहे. हळूहळू काळ पुढे सरकत गेला. सारिका सोनवणे हिच्या पतीचे सन २०१८-१९ या कालावधीत निधन झाले. दरम्यान चार ते पाच वर्षाच्या कालावधीत सारिका सोनवणे आणि निंबा शिरसाठ यांचे संबंध बरेच विकसीत झाले. त्यामुळे तिने कधी आजारपण कधी मुलाचे शिक्षण, शेती अशी विविध कारणे सांगून विश्वस्त निंबा शिरसाट यांच्याकडून जवळपास २० ते २५ लाख रुपये उधार घेतले आणि परत केलेच नाही. जसे सेवेकऱ्यांचे पैसे तिने परत केले नाही तसेच विश्वस्त निंबा शिरसाठ यांचे देखील पैसे तिने परत केले नाही असे म्हटले जाते. काळ पुढे सरकत होता. जानेवारी २०२३ मधे एके दिवशी सारिकाने आपला करिश्मा दाखवला. आपल्या मोबाईलमधील काही आक्षेपार्ह व्हिडिओ तिने निंबा शिरसाट यांना दाखवले. ते आक्षेपार्ह व्हिडीओ बघून निंबा शिरसाठ जाम हादरले. या अश्लिल व्हिडीओमधे निंबा शिरसाठ यांना त्यांचा मॉर्फ केलेला चेहरा दिसून आला. हा व्हिडीओ कितपत खरा आहे हा पोलिस तपासाचा भाग आहे हे आम्ही आपणास अगोदरच सांगितले आहे. आता मला २० कोटी रुपये द्या नाहीतर मी आपल्याविरुद्ध बलात्काराची खोटी फिर्याद दाखल करते आणि हा व्हिडीओ व्हायरल करते अशी तिने निंबा शिरसाठ यांना धमकीच दिली. या अश्लिल व्हिडीओच्या बळावर सारिका सोनवणे या महिलेने शिरसाठ यांना ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. या ब्लॅकमेलींगच्या कामात सारिका सोनवणे या महिलेचा माहिती व तंत्रज्ञान तज्ञ असलेला मुलगा मोहीत सोनवणे हा देखील सक्रीय झाला. या कथित बनावट व्हिडीओला घाबरुन निंबा शिरसाठ यांनी कसेबसे पन्नास लाख रुपये जमा करुन दिल्याचे म्हटले जात आहे. मात्र तरीदेखील सारिका सोनवणे व तिचा मुलगा मोहित सोनवणे यांची लालसा कमी झाली नाही. सारिका सोनवणे या महिलेने निंबा शिरसाठ यांना पुन्हा दहा कोटी ५० लाख रुपयांची मागणी केली. रक्कम दिली नाही तर हा व्हिडीओ व्हायरल करण्याची आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी तिने शिरसाठ यांना दिली. आता पाणी डोक्यावरुन जात असल्याचे बघून निंबा शिरसाठ यांनी गंगापूर पोलिस स्टेशनला सारिका सोनवणे विरुद्ध रितसर तक्रार दाखल करण्याचे ठरवले. भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा स्वामी समर्थांचा मंत्र म्हणत त्यांनी गंगापूर पोलिस स्टेशन गाठत सारिका सोनवणे विरुद्ध रितसर तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर गंगापूर पोलिसांनी सारिका सोनवणे हिला खंडणी वसुल करतांना ताब्यात घेण्यासाठी सापळा रचण्याचे काम सुरु केले. ठरल्यानुसार शनिवार १८ नोव्हेंबरच्या मध्यरात्री निंबा शिरसाठ दहा लाख रुपयांची रोकड घेऊन नाशिकच्या जेहान सर्कल परिसरात गेले. या ठिकाणी ठरल्यानुसार सारिका सोनवणे आणि तिचा मुलगा मोहीत सोनवणे असे दोघे आले. यावेळी गंगापूर पोलिसांचे पथक दबा धरुन बसले होते. दहा लाख रुपयांच्या खंडणीची रक्कम स्विकारतांना दोघा मायलेकांना गंगापूर पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेत अटक केली. पोलिसांनी या महिलेचे लॅपटॉप, मोबाईल व इतर साहित्य जप्त केले. ज्या व्हिडिओच्या आधारे निंबा शिरसाठ यांना त्रास दिला जात होता त्याची सत्यता तपासली जाणार असल्याचे गंगापूर पोलिसांनी म्हटले आहे. या प्रकरणी गंगापूर पोलीस स्टेशनला दाखल गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे करत आहेत. काही वर्षापूर्वी बुवा तेथे बाया हा नाट्यप्रयोग गाजला. आपल्या विवाह संस्थेने निती नियमांची तटबंदी उभी केली आहेत. फक्त एकमेव प्रभू श्रीरामचंद्र एक पत्नीव्रता होते. रामायण काळापासून आपण कलियुगात आलो. १९६५ ते ६७ च्या काळात अभिनेता दिलीपकुमार अभिनीत गोपी चित्रपटात एक भजन दाखवले आहे. त्या भजनात म्हटले आहे की कर्म भी होगा, धर्मभी होगा पर शर्म नही होगी. म्हणजे क्षेत्र कुठलेही असो लाज शरम यांची होळी केली जात असल्याचे या कलीयुगात दिसून येत आहे. तरीदेखील अध्यात्मिक क्षेत्रातले लोक देव ध्यानी म्हणून पवित्र मानले जातात. माणसाकडे एखादा बडा हुद्दा किंवा गडगंज धनसंपत्ती आली म्हणजे त्याची आर्थिक कुंडली काढून जाळे फेकण्यास काही महिला तयार होतात. खुशाल कुणीही कुणाचे बेड पार्टनर बनतात. व्हिडिओ ब्लॅकमेलिंग हा प्रकार आता नवा राहिलेला नाही. इज्जतीचे खोबरे होऊ नये म्हणून सॉफ्ट टार्गेट बघूनच काही महिलांकडून ब्लॅकमेलींगचे फासे टाकले जातात. सामनेवाल्यास अडकवण्यासाठी जो व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली जाणार आहे त्यात त्याची बदनामी किती? आपली बदनामी किती? याचाही हिशोब केला जातो. माणसाची चूक जवळपास असतेच म्हणून सरळ सरळ काही कोटी देखील दिले घेतले जातात. दिंडोरीच्या आध्यात्मिक केंद्रात अब्रू वाचवण्यासाठी कोणी एखादा शिरसाठ एक कोटी देईलही. त्याच्या आर्थिक संपत्तीची माहिती मिळवणारी ती महिला देखील चतुर म्हटली पाहिजे. तिने शिकार केली. जळगाव जिल्ह्यात मात्र अशा पद्धतीने जाळे फेकून ब्लॅकमेल करणाऱ्या महिलेचा काही वर्षापुर्वी खून पाडण्यात आला.

## फ्रॅक्चर केल्याने सुडाने पेटला...

त्याच्या घरचे लोक ही त्याच्या वागण्याला आणि दारूच्या व्यसनाला कंटाळलेले होते. त्याच्या घरच्या लोकांना त्याचे लग्न करायचे होते परंतु हा काही ही कामधंदा करीत नसल्याने आणि त्याला दारूचे व्यसन लागलेले असल्याने मुलगी कोण देणार? असा प्रश्न त्याचेसमोर होता परंतु तरी ही ते त्याच्यासाठी चांगल्या स्थाळाच्या शोधात होते. अशोक हा काही केल्या दारू सोडत नव्हता. त्यातच त्याचा स्वभाव हा भांडखोर आणि चिडखोर असल्याने त्याची कायम मित्राबरोबर भांडणे होत होती. त्याची खास मैत्री ही पाडळकर कॉलनीतील संग्राम पाडळकर आणि आयसोलेशन हॉस्पिटलजवळील नेहरूनगर भागात राहणाऱ्या शुभम उर्फ बंडा मोरे यांच्या बरोबर होती. हे दोघे ही गोकुळ शिरगाव येथील औदयोगीक वसाहातीतील कारखान्यात त्याच्यासोबतच काम करीत होते. पाच सहा वर्षापासून ते एकत्रीत काम करीत असल्याने काम सुटले की ते तिघे ही दारू प्यायला एकत्र बसत होते. दारू पित असताना त्याचेत कुठल्या ना कुठल्या कारणातून वाद विवाद आणि भांडण तंटा हा होत असे. बहुदा हा वाद शुभम पाटील याच्या चिडखोर आणि भांडखोर स्वभावाने होत असल्याने संग्राम पाडळकर हा गप्प बसत होता परंतु शुभम उर्फ बंडा मोरे याला शुभम पाटील याचा स्वभाव आवडत नव्हता. तो काय असेल ते त्याला स्पष्टच तोंडावर बोलत असल्याने अशोक पाटील याला शुभम मोरे याचा राग येत होता.सन २०१९ मध्ये कोरोनाने अनेक उदयोगधंदे बंद पडले त्यावेळी या तिघांचा ही कारखाना बंद होता. त्यामुळे त्याच्या हाताला काही एक कामधंदा नव्हता. त्यामुळे हे तिघे ही त्यावेळी इकडची तिकडची उसणवारी करून दारू पित होते. हातात पैसे नसल्याने दारू पिण्यासाठी ते बारमध्ये जात नव्हते. रात्रीच्या अंधारात मोकळ्या मैदानात किंवा अडोशाला उभे राहून ते दारू पित असायचे.त्यावेळी सन २०१९ मध्ये एके ठिकाणी ते तिघे दारू पित असताना संग्राम पाडळकर आणि शुभम पाटील याचेत काही तरी कारणावरून वाद झाला. तो वाद त्यावेळी तिथल्या तिथे मिटला. परंतु ज्यावेळी हा वाद झाला त्यावेळी त्याच्या वादात संग्राम याच्या बाजूने बोलत शुभम मोरे याने शुभम पाटील याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याचा राग शुभम पाटील याला होता. याचा बदला म्हणून शुभम पाटील याने शुभम मोरे याच्या घरात दुसऱ्या दिवशी घुसून त्याला मारहाण केली. या मारहाणीत शुभम मोरे याचे हात पाय फॅक्चर झाले होते. त्यामुळे त्याला दवाखान्यात काही दिवस राहवे लागले होते. त्या दोघांची दारूच्या नशेत भांडण परंतु शुभम पाटील याने शुभम मोरे याला मारहाण करून नुसती आफत ओढावून घेतले होते.त्यावेळी पासून शुभम मोरे हा शुभम पाटील याच्यावर चिडून होता. कधी एकदा शुभम पाटील याला आपण मारतो असे त्याला झाले होते.त्या तिघात त्यावेळी जरी भांडणे झाली असली तरी मागचे सगळे विसरून हे तिघे ही परत एकत्रीत आले. त्यामुळे ते तिघे ही दारू प्यायला एकत्र बसत होते. जरी ते तिघे एकत्र बसत असले तरी शुभम पाटील याला शुभम मोरे याच्या मनातील काही कळाले नव्हते. त्याला आपण मागे मारहाण केली आहे आपल्या मारहाणीत त्याचे हातपाय फॅक्चर झाले होते हे शुभम पाटील विसरून गेला होता. परंतु ही गोष्ट मात्र शुभम मोरे मात्र विसरला नाही. तो शुभम पाटील याचा बदला कधी तरी घ्यायचाच या विचारात होता.तो मनातून त्याचेवर चिडून असला तरी एकत्र असला की तो आपण अजून परत जवळचे मित्र आहोत हे दाखवत होता. त्याचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत हे शुभम पाटील याला ओळखता आले नाही. त्यामुळे बिनधास्तपणे त्याच्या बरोबर दारू पित बसत होता.त्याच्या बरोबर फिरत होता. कधी कधी शुभम याने त्याच्याबरोबर भांडण जरी काढले तरी ते गप्प बसत होते. परंतु त्या दोघांच्या मनात मात्र वेगळेच होते. त्या दोघांच्या मनात धुसफुस सुरूच होती. बुधवार दि.२९ रोजी रात्री शुभम पाटील,संग्राम पाडळकर आणि शुभम मोरे हे तिघेजण दारू पिण्यासाठी बाहेर बसले होत. दारू पिऊन नशा झाल्यावर ते आपआपल्या घराकडे जात असताना शुभम मोरे आणि संग्राम पाडळकर यांनी दारू कमी पडली आहे परत एक अर्धा क्वाटर घेऊया असे त्या दोघांनी शुभम पाटील याला म्हटले.त्यावेळी शुभम पाटील याने त्याच्यासाठी आणि आपणासाठी परत एकदा दीड क्वाटर वाईन मधून विकत आणली. ती क्वाटर पिण्यासाठी म्हणून ते तिघे ही मैलखड्डयाजवळील मोकळ्या मैदानात आले. त्या तिघांनी समान वाटणी करून दीड क्वाटर प्यायली. आता त्या तिघांना ही नशा चढली होती. तिघे ही नशेत एकमेकांना शिवीगाळ करीत होते. आधी मागील भांडणाचा राग शुभम मोरे याच्या मनात होताच.तो आपल्या फॅक्चर झालेल्या हातापायाकडे बघून शुभम पाटील याच्याकडे रागाने बघत होता. यावेळी शुभम पाटील याला शुभम मोरे याचा राग आला. रागाच्या भरात त्याने शुभम मोरे याला शिवीगाळ करीत तुझे परत एकदा हात पाय मोडतो बघ असे म्हटले. यातूनच त्याच्यात परत वाद विवादाला सुरूवात झाली. रात्रीचे ११ वाजून गेले होते. रात्रीच्या अंधारात मोकळ्या मैदानात त्या तिघांच्या शिवाय कुणी ही नव्हते नेमक्या याच संधीचा फायदा उठवत शुभम मोरे आणि संग्राम पाडळकर यांनी शुभम मोरे याला खाली पाडून मारहाण करायला सुरूवात केली. तु परत माझा हात पाय मोडणार काय? असे म्हणत शुभम मोरे याने बाजुलाच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि रागाच्या भरात खाली पडलेल्या शुभम पाटील याच्या डोक्यात पाच ते सहा वेळा घातला. त्याने दगडाचा जोरात मारा केल्याने शुभम पाटील याचे डोके फुटून त्याचा मेंदू बाहेर आला. तर चेहरा ही छिन्न विच्छन झाला. त्याचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्या दोघाच्या लक्षात आल्यावर त्या दोघांनी ही अंधाराचा फायदा घेत तेथून पलायन केले. त्यानंतर रात्रीच्या सुमारास म्हणजे औदयोगीक वसाहतीतील रात्र पाळी सुटल्यानंतर दोघे तिघे कामगार त्या मोकळ्या मैदानातून जात असताना त्यांना रात्रीच्या अंधारात एका तरूणाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात छिन्नविच्छन अवस्थेत पडला असल्याचे दिसले. त्यातील एकाने आपल्या मोबाईल वरून १०० नंबर डायल करून या घटनेची माहिती जुना राजवाडा पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच जुना राजवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस आणि स्थानिक गुन्हा अन्वेषनेचे पोलीसांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात एका तरूणाचा मृतदेह पडला होता. बाजुलाच रक्ताने माखलेला मोठा दगड, दारूच्या बाटल्या,ग्लास पडलेले होते. मयत तरूणाचा मेंदू बाहेर पडला होता. तर चेहरा ही छिन्नविच्छन झालेला होता. मयताच्या खिशातील कागदपत्रावरून मयत तरूणाची ओळख ही शुभम अशोक पाटील अशी पटली. पोलीसांनी या घटनेची माहिती मयत शुभम पाटील याच्या घराच्या लोकांना दिल्यावर ते ही घटनास्थळी आले.मयताच्या अंगावरील कपडयावरून आणि कागद पत्रावरून त्यांनी ही मयत तरूण हा शुभम पाटील हा असल्याचे पोलीसांना सांगितले.पोलीसांनी घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी कोल्हापूर सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला.या घटनेची माहिती पोलीसांनी मयत शुभम पाटील याच्या घरच्या लोकाकडून घेतली असता मयत शुभम पाटील याचे सन २०१९ मध्ये शुभम मोरे आणि संग्राम पाडळकर याच्याबरोबर वाद होऊन शुभम याने शुभम मोरे याचे हात पाय मोडले असल्याची माहिती मिळाली. या घटनेनंतर ते दोघे ही बेपत्ता झाले असल्याने आणि त्याचे मोबाईल ही बंद येत असल्याने पोलिसांचा त्याचेवरील संशय बळावला. यातच ते दोघे ही कोल्हापूर सोडून पळून जाणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाल्याने पोलीसांनी तीन पथके त्याच्या शोधासाठी तयार करण्यात आली. दुसऱ्या दिवशी दुपारी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी त्या दोघांना कोल्हापूर बाहेर असणाऱ्या एका बारमधून ताब्यात घेतले.त्यांना जुना राजवाडा पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे शुभम पाटील याच्या खूनाविषयी विचारले असता ते दोघे ही पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होते. पोलीसांनी त्यांना आपला पोलीसी खाक्या दाखविला असता त्या दोघांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्यावर मयत शुभम पाटील याच्या नातेवाईकाकडून या घटनेची फिर्याद पोलीसांनी घेतली.त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी जुना राजवाडा पोलीस स्थानकात शुभम अशोक पाटील (वय ३०) रा. रामानंदनगर कोल्हापुर याच्या खून प्रकरणी त्याचे मित्र संग्राम रंगराव पाडळकर (वय २५) रा.पाडळकर कॉलनी कोल्हापूर, शुभम उर्फ बंडा प्रकाश मोरे (वय २५) रा.आयसोलेशन हॉस्पिटल, नेहरूनगर कोल्हापूर याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्यांना कोल्हापूर येथील कोर्टात पोलीसांनी हजर केले असता मा.कोर्टाने त्यांना ५ डिसेंबरपर्यंतची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा तपास पोलीस उपाधिक्षक अजित टेके, स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पो.निरी.वाघमोडे, जुना राजवाडा पोलीस स्टेशनचे पो.निरी.सतीशगुमार गुरव याच्या मार्गदर्शनाखाली जुना राजवाडा पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले.


## मालकाचा ट्रॅक्टर नोकराने चोरुन...

गुन्हेगार कितीही हुशारीने वागत असले तरी ते सापडतात. आपली चोरी रोखण्यास अथवा विरोध करण्यास कुणी पुढे आला तर प्रसंगी त्याचा खून करण्यास देखील चोरटे मागेपुढे बघत नाही. मात्र चोर आणि गुन्हेगार जेवढे हुशार असतात तेवढेच पोलिस प्रशासन देखील अद्ययावत झाले आहे. तांत्रीक पुरावे अर्थात सीसीटीव्ही हे आजकाल फार मोलाची कामगिरी करत आहेत. आजच्या युगातील सीसीटीव्ही हेच जणूकाही पोलिसांचे खबरी झाले आहेत. सीसीटीव्ही मुळे गुन्हेगार पकडले जात असले तरी सर्वसामान्य मनुष्याचे सार्वजनिक जीवन मात्र धोक्यात आले आहे हे सत्य नाकारता येत नाही. सीसीटीव्ही पुराव्यासह परिस्थितीजन्य पुराव्यांमुळे जळगाव स्थानिक गुन्हे शाखा आणि एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने ट्रॅक्टर चोरीस विरोध करणा-या रखवालदाराचा खून करणा-या शालक आणि मेहुणा या दोघा नातेवाईकांना गजाआड केले. ट्रॅक्टर चोरी करण्यास विरोध केला एवढेच कारण रखवालदाराची हत्या होण्यास पुरेसे ठरले. जळगाव तालुक्यातील बिलवाडी या गावी राजेंद्र पाटील यांची शेती आहे. या शेतीची देखभाल करण्यासाठी त्यांनी पवन बहाधीर बारेला यास सालदार म्हणून ठेवले होते. मध्य प्रदेशातील बगहद ता. राजपूर जिल्हा बडवाणी येथील मुळ रहिवासी असलेला पवन बारेला हा त्याच्या पत्नी व मुलांसह राजेंद्र पाटील यांच्या शेतावर रहात होता. रात्रीच्या वेळी शेतीची रखवालदारी करण्याची जबाबदारी पवन बारेला याच्यावर होती. पवन बारेला याचे मध्य प्रदेशातील बडवाणी जिल्ह्यातील मुळ गाव बगहद पासून जवळच असलेल्या सालीकल तांडा या गावी त्याचा शालक वादरसिंग सुभाराम बारेला हा रहात होता. दिवाळी सणाच्या कालावधीत ११ नोव्हेंबर २०२३ रोजी वादरसिंग बारेला हा त्याच्या बहिणीचा पती पवन बारेला याच्याकडे दोन दिवस मुक्कामी आला होता. त्यावेळी शेतमालक राजेंद्र पाटील यांची गुरे ढोरे चारणा-या पांडुरंग पाटील याच्यासोबत वादरसिंग याची ओळख झाली होती. दिवाळी सणानिमीत्त पवन बारेला आणि वादरसिंग बारेला या दोघांनी परिवारासह आपल्या मुळ गावी मध्य प्रदेशात जाण्याचे निश्चित केले. पवन बारेला हा शेत मालक राजेंद्र पाटील यांच्या मोटार सायकलने तर वादरसिंग हा त्याच्या मोटार सायकलने जाण्यास निघाले. आपापल्या मुळ गावी गेल्यानंतर पवन बारेला याने त्याचा शालक वादरसिंग बारेला यास त्याच्या मनातील योजना मोबाईलवर समजावून सांगितली. मी बिलवाडी येथे ज्या शेतमालकाकडे काम करतो त्या शेतातून आपल्याला ट्रॅक्टर आणायचे आहे असे पवन याने त्याचा शालक वादरसिंग यास समजावून सांगितले. आता दिवाळी सण असल्यामुळे शेताची रखवालदारी करण्यासाठी कुणी नसेल आणि आपण आपल्या गावी आल्यामुळे आपल्यावर कुणाचा संशय येणार नाही असा पवन बारेला याने मनाशी समज केला होता. त्यानुसार त्याने आपल्या मनातील योजना शालक वादरसिंग यास फोनवर सांगितली. काही वेळाने पवन बारेला हा वादरसिंग यास भेटण्यासाठी त्याच्या घरी गेला. दोघांनी मोहाची दारु प्राशन केली. मद्य प्राशन केल्यानंतर दोघांनी बिलवाडी येथे लागलीच जाण्याचे निश्चित केले. बिलवाडी येथील राजेंद्र पाटील यांच्या शेतातून ट्रॅक्टर चोरी करण्यासाठी दोघे मोटार सायकलने निघाले. वाटेत चोपडा फाट्यानजीक दोघांनी बिअर प्राशन केली. शिरपूर, चोपडा, धरणगाव, एरंडोल, म्हसावद मार्गे दोघे राजेंद्र पाटील यांच्या शेताजवळ आले. ज्या शेतमालकाकडे आपण काम करतो त्याच राजेंद्र पाटील यांच्या शेतात ट्रॅक्टर चोरी करण्यासाठी पवन बारेला याने वादरसिंग याला देखील आणले होते. रात्री साडे दहा ते अकरा वाजेचा सुमार होता. शेताचे लोखंडी गेट उघडून दोघे आत आले. पवन बारेला याच्या गैर हजेरीत गुरे चारणाऱ्या पांडुरंग पाटील याच्यावर शेताच्या रखवालीची जबाबदारी राजेंद्र पाटील यांनी दिली होती. रात्रीच्या अंधारात कुणीतरी अनोळखी दोन जण आले असल्याचे बघून पांडुरंग पाटील हे जागे झाले. पवन आणि वादरसिंग हे दोघे ट्रॅक्टरजवळ गेले. ट्रॅक्टर सुरु झाल्याच्या आवाजाने पांडुरंग पाटील यांनी खाटेवरुन उठत कोण आहे तिथे? असा जोरात आवाज दिला. पांडुरंग पाटील यांना पाहताच वादरसिंग चमकला. वादरसिंग याने पांडुरंग पाटील यास ओळखले. दिवाळी सणापुर्वी वादरसिंग हा पवन याच्याकडे आला होता. त्यावेळी त्याची आणि पांडुरंग पाटील या दोघांची ओळख झाली होती. पांडुरंग पाटील खाटेवरुन उठुन तुम्ही दोघे एवढ्या रात्री काय करत आहात असा प्रश्न केला. पांडुरंग पाटील आपल्याला विरोध करणार हे लक्षात आल्याने दोघे त्याच्याजवळ गेले. वादरसिंग याने पांडुरंग यास पकडून ठेवले. त्यावेळी दोघात झटापट झाली. त्याचवेळी पवन बारेला याने जवळच पडलेल्या ट्रॅक्टरच्या लोखंडी डाबरचे जबर घाव पांडुरंग पाटील याच्या डोक्यात घातले. दोन वेळा लोखंडी डाबरचे घाव डोक्यात बसल्यानंतर पांडुरंग पाटील याच्या डोक्यातून रक्त निघू लागले आणि तो जखमी होत जमीनीवर कोसळला. पांडुरंग पाटील तडफडत असतांना त्याची हालचाल कायमची बंद झाली. पांडुरंग पाटील मरण पावल्याची खात्री झाल्यानंतर वादरसिंग याने ट्रॅक्टर सुरु केले. वादरसिंग ट्रॅक्टरने आणि पवन त्याच्या ताब्यातील मोटार सायकलने असे दोघे जण म्हसावद रस्त्याने निघाले. वाटेत काही अंतरावर म्हसावद गावाकडे जात असतांना ट्रॅक्टर मधील इंधन संपले. त्यामुळे ट्रॅक्टर बंद पडले. त्यामुळे पवन आणि वादरसिंग हे दोघे मोटार सायकलने पेट्रोल पंपावर गेले. पेट्रोल पंपवरुन त्यांनी ट्रॅक्टर सुरु करण्यासाठी पाचशे रुपयांचे इंधन विकत घेतले. पुन्हा दोघे बंद पडलेल्या ट्रॅक्टरजवळ आले. वादरसिंग याने ट्रॅक्टर सुरु केल्यानंतर दोघे आपापल्या ताब्यातील वाहनाने पुढे मार्गस्थ झाले. मात्र काही अंतर पुढे गेल्यानंतर पुन्हा ट्रॅक्टर बंद पडले. बराच प्रयत्न केल्यानंतर देखील ट्रॅक्टर काही सुरु झाले नाही. अखेर चोरीचे ते ट्रॅक्टर त्या ठिकाणी तसेच सोडून दोघे मोटार सायकलने आपल्या गावी निघून गेले. ज्या ट्रॅक्टर चोरीसाठी दोघे आले ते ट्रॅक्टर त्यांना मिळाले नाही मात्र त्या घटनेत पांडुरंग पाटील याचा जीव मात्र नाहक गेला होता. रस्त्यात हातपाया धुतल्यानंतर दोघे पुन्हा आपल्या पुढील प्रवासाला निघाले. सकाळी सहा वाजेच्या सुमारास दोघे आपल्या गावी सालीकल तांडा येथे पोहोचले. गावाच्या बाहेर असलेल्या बस स्थानकावर काही वेळ थांबून दोघे आपापल्या घरी गेले. रात्रीचा खूनाचा प्रकार त्यांनी घरात कुणालाही सांगितला नाही. आम्ही दिवाळी पाहण्यासाठी गेलो होतो असे त्यांनी घरी सांगत वेळ मारुन नेली. अंगातील कपडे काढून दुसरे चांगले कपडे घालून दोघे नदीवर अंघोळीला गेले. इकडे बिलवाडी येथे शेतमालक राजेंद्र पाटील हे नेहमीप्रमाणे सकाळी सहा वाजता म्हशींचे दुध काढण्यासाठी शेतात आले. शेतात आल्यानंतर त्यांना पांडुरंग पाटील यांचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह दिसला. रात्री राजेंद्र पाटील आणि पांडुरंग पाटील हे दोघे जण काही वेळ गप्पा करत बसले होते. गप्पा केल्यानंतर राजेंद्र पाटील हे आपल्या घरी निघून आले होते. त्यानंतर सकाळी त्यांचा मृतदेहच राजेंद्र पाटील यांना दिसला. त्यांचा रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह बघून राजेंद्र पाटील भयभीत झाले. याशिवाय शेतातील ट्रॅक्टर आणि रोटर देखील चोरीला गेल्याचे आढळून आले. त्यांनी लागलीच या घटनेची माहिती गावचे पोलिस पाटील यांना कळवण्यात आली. पोलिस पाटील यांच्यामार्फत पोलिसांना माहिती समजल्यानंतर लागलीच एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पो.नि. जयपाल हिरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किसनराव नजनपाटील तसेच वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी हजर झाले. घटनास्थळाची पाहणी व पंचनामा तसेच इतर कायदेशीर सोपास्कार पुर्ण करण्यात आले. या घटने प्रकरणी मयत पांडुरंग पाटील यांचा पुतण्या भरत उखा पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एमआयडीसी पोलिस स्टेशनला अज्ञात मारेक-याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. भाग ५ गु.र.न. ७५५/२३ भा.द.वि. ३०२, ३९२ नुसार हा गुन्हा नोंद करण्यात आला. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किसनराव नजनपाटील यांच्याकडे देण्यात आला. याकामी स.पो.नि. निलेश राजपूत, सहायक फौजदार विजयसिंग पाटील, हे.कॉ. सुधाकर अंभोरे, हे.कॉ. जितेंद्र पाटील, प्रितम पाटील, प्रमोद लाडवंजारी, किरण धनगर, भारत पाटील, संदिप सावळे, ईश्वर पाटील, लोकेश माळी आदींचे तपास पथक तयार करण्यात आले. घटनास्थळी मिळालेले पुरावे, गोपनीय माहिती तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे बिलवाडी येथील शेत मालक राजेंद्र ईश्वर पाटील यांच्याकडे कामाला असलेला सालदार पवन बहाधीर बारेला याच्यावर पोलिसांचा संशय बळावला. पवन बारेला हा त्याच्या परिवारासह दिवाळी सणानिमीत्त मध्य प्रदेशातील मुळ गावी सालिकल तांडा ता. राजापुर जिल्हा बडवाणी येथे गेला होता. दरम्यान चोरी झालेले ट्रॅक्टर पोलिसांना घटनास्थळापासून काही अंतरावर आढळून आले. ते ताब्यात घेण्यात आले. काही तासातच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मध्य प्रदेशातील बडवाणी जिल्ह्याच्या सालीकल तांडा येथे जावून धडकले. त्याठिकाणी पवन बहाधीर बारेला आणि त्याच्यासोबत त्याचा शालक वादरसिंग शोभाराम बारेला हे दोघे मिळून आले. सुरुवातीला पवन बारेला याची चौकशी करण्यात आली. पोलिस पथकापुढे तो फार वेळ खोटे बोलू शकला नाही. त्याने आपला गुन्हा कबुल केला. या गुन्ह्यात त्याचा शालक वादरसिंग शोभाराम बारेला याचा देखील सहभाग असल्याचे त्याने कबुल केले. दोघांना अटक करण्यात आली. गुन्हा दाखल झाल्यानंतर चोवीस तासांच्या आत पोलिसांनी हा गुन्हा उघडकीस आणला. पोलिस अधिक्षक एम. राजकुमार, अतिरिक्त पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी तसेच सहायक पोलिस अधिक्षक ऋषीकेश रावले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किसनराव नजनपाटील, एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पो.नि. जयपाल हिरे आदींनी आपल्या सहका-यांच्या मदतीने हा गुन्हा उघडकीस आणत दोघा संशयीत आरोपींना जेरबंद केले. याकामी स.पो.नि. निलेश राजपूत, सहायक फौजदार विजयसिंग पाटील, हे.कॉ. सुधाकर अंभोरे, हे.कॉ. जितेंद्र पाटील, प्रितम पाटील, प्रमोद लाडवंजारी, किरण धनगर, भारत पाटील, संदिप सावळे, ईश्वर पाटील, लोकेश माळी तसेच एमआयडीसी पोलिस स्टेशनचे स.पो.नि. ए.सी. मनोरे, अमोल मोरे, पोलिस उप निरीक्षक निलेश गोसावी, रुपाली महाजन, रविंद्र गिरासे, हे.कॉ. राजेंद्र कांडेकर, दिपक चौधरी, स्वप्नील पाटील, पोलिस नाईक प्रदीप पाटील, किशोर पाटील, पो.कॉ. हेमंत पाटील, छगन तायडे यांनी सहभाग घेतला.

## धाग्यामुळे मृतदेहाची ओळख पटली...

अहवालात स्पष्ट झाल्यानंतर नायगाव पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला. या मृतदेहाची ओळख पटवून आरोपींना पकडण्याचे आव्हान पोलिसांपुढे होते. गुन्हे शाखा २ च्या पथकाने या प्रकरणाचा तपास करण्यासाठी ३ विशेष पथके स्थापन केली होती. ज्या ठिकाणी मृतदेह आढळला तिथे सीसीटीव्ही नसल्याने तपास खूप आव्हानात्मक बनला होता. या मृतदेहाच्या पायाला एक विशिष्ट दोरा बांधला होता. आदिवासी समाजात असा दोरा बांधण्याची प्रथा आहे. त्यामुळे मृत व्यक्ती ही आदिवासी असल्याची शक्यता गृहीत धरून तपासाची दिशा ठरविण्यात आली. पोलिसांनी मृतदेहाचे छायाचित्रे असलेले ५ हजार पत्रकं तयार करून परिसरातील सर्व आदिवासी पाड्यांमध्ये आणि गावांमध्ये वाटण्यास सुरवात केली. पोलिसांच्या प्रयत्नांना यश आले. कामणच्या बीबी पाडा येथून ८ नोव्हेंबर रोजी बेपत्ता असलेल्या लवेश माळी (२३) या तरुणाचा हा मृतदेह असल्याची ओळख पटली. त्यांनतर जलद तपास केला आणि खबऱ्यांच्या मार्फत माहिती मिळवून ३ आरोपींना पोलिसंनी अटक केली. यामध्ये एक विधिसंघर्ष बालक आहे. याबाबत माहिती देताना गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांनी सांगितले की, मृत लवेश कोळी याने एका आरोपीची रिक्षा चालवायला घेतली होती. मात्र त्या रिक्षाची काच फुटल्याने आरोपी त्याच्याकडे पैसे मागत होता. त्या पैशांवरून वाद झाल्याने आरोपी आणि त्याच्या दोन साथीदारांनी लवेश माळीची हत्या केली. पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह बापाणे येथील झुडपात टाकून दिला. आरोपी आणि मृत व्यक्ती हे एकमेकांच्या परिचयाचे होते आणि त्यांना अमली पदार्थांच्या सेवनाचे व्यसन होते असे पोलिसांनी सांगितले. केवळ पायात असेलला दोरा आणि चप्पल यावरून आरोपीची ओळख पटवून मारेकऱ्यांना पकडणे शक्य झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात?आले. गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक शाहूजी रणावरे, सहायक पोलिस निरीक्षक सुहास कांबळे, सहायक पोलिस निरीक्षक सागर शिंदे आणि त्यांच्या पथकाने हा तपास करून आरोपींना अटक करण्यात यश मिळवले.

# बिबट्याच्या हल्ल्यात मुलगा गंभीर जखमी





**बोईसर/प्रतिनिधी**

पालघर तालुक्यातील तारापुर जवळील कुडण येथे एका सात वर्षीय शाळकरी मुलावर बिबट्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. बिबट्याच्या हल्ल्यात हा मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी सिलवासा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पालघर तालुक्यातील तारापुर जवळील कुडण येथे आपल्या कुटुंबियासोबत राहणारा प्रेम जितेंद्र पाटील (७) हा मुलगा मंगळवारी पहाटे सात वाजता दाट धुके असताना आपल्या घरापासून जवळच असलेल्या किराणा दुकानात खाऊ आणण्यासाठी गेला असताना त्याच्यावर अचानक एका प्राण्याने हल्ला केला. या हल्ल्यात हा मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याचा डोक्याला आणि चेहऱ्याला चावा घेण्याच्या आणि ओरबडल्याच्या गंभीर जखमा झाल्या आहेत. बिबट्याने हल्ला केल्यानंतर मुलाने जोरात आरडाओरड केल्याने जवळचे नागरीक धावून आले, तो पर्यंत दाट धुक्याचा फायदा घेत तो प्राणी पसार झाला. गंभीर जखमी झालेल्या प्रेम पाटील या मुलाला उपचारासाठी सिलावासा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पालकांना प्रथम हा हल्ला कुत्रा किंवा अन्य वन्य प्राण्याने केल्याची शक्यता वाटल्याने त्याबाबत त्यांनी कोणाकडेही वाचता केली नाही. मात्र त्यादिवशी तारापूर अणुऊर्जा केंद्राच्या परिसरात बिबट्याचा वावर असल्याची पुष्टी मिळाल्यानंतर याबाबत वनविभागाला कळवण्यात आले. या लहान मुलावर झालेल्या जखमां चा अभ्यास करून हा हल्ला बिबट्याने केला असल्याची शक्यता उपचार करणारे डॉक्टर व वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. बिबट्याने लहान मुलावर हल्ला केल्याची घटना समजल्यावर डहाणू वनविभाग, बोईसर वनपरीक्षेत्र कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, डहाणूचे वन्यजीव बचाव पथकाचे स्वयंसेवक आणि तारापूर पोलिसांनी बिबट्याचा शोध घेण्याची मोहीम सुरू केली. चिंचणी व तारापूर परीसरात मागील चार-पाच महीन्यापासून बिबट्याचा वावर असून त्याने अनेक वेळा परीसरातील पाळीव कोंबड्या, कुत्रे, मांजरी आणि शेळ्या यांच्यावर हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहे. मात्र लहान मुलावर हल्ला करण्याची घटना प्रथमच घडली असून यामुळे परीसरातील लहान मुले आणि नागरीक यांच्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने या बिबट्याला पकडण्यासाठी तातडीने पिंजरे लावण्याची मागणी होत आहे.

# देवणीतील सावरगाव येथे मनरेगा योजनेतून बांबू लागवड

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील सावरगाव ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील सर्व शेतकऱ्यांना बांबू लागवडीचे महत्त्व समजावू सांगून त्यांना प्रेरित करून बांबू लागवड करण्यासाठी तयार केले आहे. सर्वात जास्त लाभार्थी या योजनेत सहभागी होऊन बांबू लागवड स्वयंप्रेने करायला लागले बांबू लागवड हे शेतकऱ्यांना शेती पूरक उत्पन्न असून, नरेगा योजनेतून बांबूंचे रोपे वाहतुकीसह उपलब्ध करून दिले जाते व तीन वर्षभरात त्याचे संगोपन करण्याचे सुद्धा रोजगार या योजनेतून दिले जाते, त्यामुळे जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सोपान अकेले गटविकास अधिकारी पंचायत समिती देवणी यांनी केले आहे, त्यांच्या प्रेरणेने सावरगाव येथील संजय बिरादार यांच्या शेतामध्ये बांबू लागवड कार्यक्रम संपन्न झाला यामुळे सर्वत्र कौतुक केले जात आहे. याप्रसंगी गावातील आजी माजी सरपंच, शेतकरी लाभार्थी, तांत्रिक कर्मचारी, त्या गावचे ग्रामसेवक मूर्के आय.एस. तसेच ग्राम रोजगार सेवक, ग्रामपंचायत सेवक व इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेकणाळ येथे उपसरपंच पदाची बिनविरोध निवड



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय नेकणाळ येथील विशेष सभेमध्ये सरपंच स.कलावती उमाकांत कोरे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ठीक २.३० वाजता उपसरपंच पदाची निवडणूक संपन्न झाली. अध्याशी अधिकारी कांबळे व्ही.एस.सहायक गटविकास अधिकारी पंचायत समिती देवणी यांच्या उपस्थितीत व तसेच मंडळ अधिकारी श्रीमती अनिता ढगे मॅडम तसेच या गावचे ग्रामसेवक मूर्के आय.एस. यांच्या उपस्थितीत उपसरपंच पदाची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊन उपसरपंच पदासाठी एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्याने सौ. सुनीता शामलाल सूर्यवंशी यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी नूतन उपसरपंच यांचा व इतर उपस्थित पदाधिकाऱ्यांचा फेटा, श्रीफळ पुस्पहार देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी गावातील शिवलिंग रासुरे, शंकरांना गरिबे, राजकुमार मुर्गे, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, महादेव कोरे, करण गरिबे, संजय पांचाळ व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर निवडणूक ही शांततेमध्ये व बिनविरोध झाल्याने सर्वांनी प्रशासनाचे अभिनंदन केले. सभेच्या शेवटी सचिव तथा ग्रामसेवक मूर्के आय.एस. यांनी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी पदाधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

# विरार रेल्वेस्थानकात केबलमध्ये शॉटसर्किटमुळे भीषण आग



**विरार/प्रतिनिधी**

विरार रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक सहाच्या जवळ असलेल्या केबलमध्ये शॉर्टसर्किट होऊन भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. सोमवारी सकाळी साडे नऊच्या सुमारास ही घटना घडली. या आगीवर अग्निशमन दलाच्या जवानांनी नियंत्रण मिळवून आग आटोक्यात आणली. विरार रेल्वे स्थानका प्रवाशांची मोठी वर्दळ सुरू असते. विशेषतः सकाळची वेळी मोठ्या संख्येने प्रवाशांची गर्दी असते.

विरार रेल्वे स्थानकात असलेल्या फलाटांच्या बाजूने विविध प्रकारच्या विद्युत केबल टाकल्या आहेत. सोमवारी सकाळी अचानकपणे फलाट क्रमांक सहाच्या बाजूला असलेल्या केबल वाहिनीमध्ये शॉर्ट सर्किट झाले. या शॉर्ट सर्किटमुळे आगीचा भडका उडाला. याशिवाय त्याचा धूर ही स्थानक परिसरात पसरला होता. या लागलेल्या आगीमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाली होते. याची माहिती वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना मिळताच घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय**
**ठाणे विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग परिसर,**
**मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड,**
**ठाणे (पश्चिम) पिन कोड-४०० ६०१.**

website : www.mahapwd.gov.in/ Email : elthane.ee@mahapwd.gov.in — दूरध्वनी क्र : (०२२) २५३३ ३१४४ / २५३० ४५१४

जा.क्र.काअ/ठाविवि/निविदा-२/४४११ /सन २०२३ — दिनांक : २९/११/२०२३

## ई-निविदा सुचना क्र. ३४ सन २०२३-२०२४

**कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा. बां.विभाग, सा.बां.विभाग, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४** यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Pereentage Rate) निविदा ऑनलाईन प्रणालीव्दारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तेथुन डाऊनलोड करण्यात यावी. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | ठेकेदारांचा वर्ग/इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क |
|---|---|---|---|
| ०१ | Est. No. 142067 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Vinval, Tal. Jawhar, Dist. Palghar. | रु.५,५०,२९६.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५५५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०२. | Est. No. 142068 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Dehare, Tal. Jawhar, Dist. Palghar. | रु.५,५०,२९६.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५५५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०३. | Est. No. 142069 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Dabheri, Tal. Jawhar, Dist. Palghar. | रु.४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०४. | Est. No. 142070 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Dabhosa, Tal. Jawhar, Dist. Palghar. | रु.५,५०,२९६.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५५५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०५. | Est. No. 142071 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Vangni, Tal. Jawhar, Dist. Palghar. | रु.४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०६. | Est. No. 142078 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Karegaon, Tal. Mokhada, Dist.Palghar. | रु.४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०७. | Est. No. 142079 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Suryamal, Tal. Mokhada, Dist. Palghar. | रु. ३,७८,१०८.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ३८००/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०८. | Est. No. 142080 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Hirve, Tal. Mokhada, Dist. Palghar. | रु. ४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०९. | Est. No. 142081 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Palasunde, Tal. Mokhada, Dist.Palghar. | रु. ४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| १०. | Est. No. 142082 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Chas, Tal. Mokhada, Dist.Palghar. | रु. ४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ११. | Est. No. 142083 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Gonde, Tal. Mokhada, Dist. Palghar. | रु. ४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| १२. | Est. No. 142085 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Karhe, Tal: Vikramgad, Dist. Palghar. | रु. ५,५०,२९६.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५५५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| १३. | Est. No. 142086 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Murbad, Tal: Vikramgad, Dist. Palghar. | रु. ३,६९,९३८.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ३७००/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| १४. | Est. No. 142087 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Bhopoli, Tal: Vikramgad, Dist. Palghar. | रु. ५,५०,२९६.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५५५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| १५. | Est. No. 142088 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Kurze, Tal: Vikramgad, Dist. Palghar. | रु. ३,७८,१०८.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ३८००/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| १६. | Est. No. 142089 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Kavale, Tal: Vikramgad, Dist. Palghar. | रु. ४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| १७. | Est. No. 142090 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Sakhare, Tal: Vikramgad, Dist. Palghar. | रु. ५,५०,२९६.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५५५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| १८. | Est. No. 142091 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Guhir, Tal: Vikramgad, Dist. Palghar. | रु. ४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| १९. | Est. No. 142092 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Pali, Tal: wada, Dist. Palghar. | रु. ५,५०,२९६.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५५५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| २०. | Est. No. 142093 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Gargaon, Tal: wada, Dist. Palghar. | रु. ४,६३,६२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| २१. | Est. No. 142094 of 2023-24 Providing 2.5 KVA Invertors in Ashram School at Bhudavall, Tal: wada, Dist. Palghar. | रु. ३,७८,१०८.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ३८००/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०५/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १९/१२/२०२३ रोजी संध्याकाळी ०६.०० पर्यंत.**
**ई-निविदा उघडणे : दिनांक २२/१२/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता.**

१) https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कामाच्या करारानाम्यात पोस्ट क्वालीफिकेशन क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.
३) कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, ठाणे, कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
**(सं. रा. पुजारी)**
कार्यकारी अभियंता (विघुत)
ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे

विमाका/कोवि/२०२३-२०२४/२३०


# सहाय्यक कामगार नूतनीकरणाचा कालावधी पाच वर्षे करा; श्रमिक क्रांती अभियान संघटनेची मागणी

**देवणी/प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील कामगारांना प्रत्येक वर्षी कामगार कार्यालयात जाऊन कामगार लोकांची नुतनीकरण करावे लागते, तरच कामगारांना इतर योजनेच्या लाभास पात्र ठरतात. नूतनीकरण केले नाही, तर परत नवीन प्रोसिजर करावी लागते. दर वर्षी कामगारांना जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन नुतणीकरण करण्यासाठी परवडत नाही तरी पाच वर्षातून एकदाच नुतणीकरण करण्यात यावे. तसेच ग्रामीण भागातील कामगार लोकांना ग्रामपंचायत ग्रामसेवक हे प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करीत आहेत. तरी शासनमान्य ठेकेदार यांच्या प्रमाणपत्राची मान्यता देण्यात यावी, यासह अनेक मागण्याची निवेदन श्रमिक क्रांती अभियान संघटना महाराष्ट्राच्या वतीने मराठवाडा प्रमुख लक्ष्मण श्रीपती रणदिवे व जिल्हाध्यक्ष गजानन गायकवाड यांनी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय लातूर यांच्याकडे १ डिसेंबर २०२३ रोजी मागणी केली आहे. त्यामुळे आता यावर तातडीने अंमलबजावी करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# वादळापूर्वीची शांतता!

मराठा आरक्षणावरून ओबीसी आणि मराठा समाज एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. आणि त्यांच्या आरोप प्रत्यारोप दावे प्रति दावे आव्हाने प्रति आव्हाने यांचा सिलसिला सुरू आहे. आज जरी या दोन्ही समाजात कोणत्याही प्रकारचा प्रक्षेप उसळलेला नसला तरी दोन्हीकडच्या लोकांची आक्रमक भूमिका पाहता केव्हा काय होईल ते सांगता येत नाही. जर ओबीसी आणि मराठा समाज यांच्या दंगल उसळली तर ती दंगल हिंदू-मुस्लिम दंगली पेक्षाही भयानक असेल आणि राज्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या कधी दलित मागासवर्गीय आणि ओबीसी समाजातील लोकांना त्याचा नाहक त्रास होईल. याचे कारण आजही ग्रामीण भागात मराठा समाजाचे वर्चस्व आहे. आर्थिक सामाजिक आणि राजकीय संस्था मराठा समाजाच्या ताब्यात आहेत. ग्रामपंचायत सारख्या संस्थांवर मराठा समाजाचे वर्चस्व आहे, अशावेळी जर मराठा ओबीसीमध्ये गाव पातळीवर जंगली सुरू झाल्या तर त्यात गरीब दलित ओबीसींचे मोठे नुकसान होईल. मात्र हे ठाऊक असतानाही सरकार केवळ बघायची भूमिका घेत आहे. कारण सरकारकडे मराठा आरक्षणावर कोणताही निर्णायक तोडगा नाही. केवळ मराठा समाजाला झुलवत ठेवण्यात आले आहे. सरकार मराठा आरक्षणाबाबतची न्यायालयीन लढाई त्याचवेळी हरले आहे, जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण नाकारले असे असताना पुन्हा पुन्हा मराठा समाजाला आरक्षणाचे अमिष का दाखवले जात आहे तेच कळत नाही. सरकारने परिणामाची चिंता न करता मराठा समाजाला एकदा सत्य सांगून टाकण्याची हिम्मत दाखवावी. कारण जर का हे प्रकरण तुमचं ठेवलं तर त्यातून फार मोठा वनवा भडकेल आणि तो वनवा सरकारला क्षमता येणार नाही. जरांगे पाटलांची सध्या जी बनवणे सुरू आहे त्याला कुठेतरी आवर घालने गरजेचे आहे. कारण जरांगे पाटलांच्या प्रत्येक सभेत आव्हानाची भाषा दिसते, बघू या कसं आरक्षण देत नाहीत, मग बघूया काय करायचे ते, आम्ही करतो अशी भाषा जर ते वापरायला लागले. तर पलीकडून त्याच भाषेत त्याला उत्तर मिळेल. अरे मग एकदा का बनवा पेटला की त्यानंतर काय करणार? कारण दोन समाजातील जनप्रेक्षकाचा हा प्रश्न कुठल्या एका शहरापुरता किंवा कुठल्या एका खेड्यापुरता मर्यादित नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जिल्हे आणि गावागावात आग भडकेल. आताही जरांगे पाटलांच्या प्रक्षेपक भाषणांमुळे गावागावांमध्ये एक वातावरण तयार होत आहे आणि हे वातावरण म्हणजेच वादळापूर्वीची शांतता आहे. त्यामुळे सरकारने मराठा समाजाच्या किंवा ओबीसी समाजाच्या दबावाखाली मूग घेऊन बसू नये, दोन्हीकडून जर कोणी प्रक्षोभक विधाने करीत असेल आणि वातावरण तापवण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्या सर्वांवर कारवाई करावी. तसे पाहता सरकार संविधानावर चालते मग संविधानात मराठ्यांना आरक्षण देण्याची कुठेही तरतूद नाही असे असताना मराठा आरक्षणाबाबत जरांगे पाटील आक्रमक भाषा कशी काय करू शकतात. आणि ते जर स्फोटक विधाने करून मराठा तरुणांना भडकवत असतील तर त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई कधी करणार तोच प्रकार ओबीसींच्या बाबतीत ओबीसीच्या एका नेत्याने हातपाय तोडण्याची धमकी दिली आहे, अशा पद्धतीच्या धमक्या आगीत तेल ओतणारे आहेत आणि एवढं सगळं घडत असताना सरकार जर गप्प राहणार असेल, तर भविष्यात महाराष्ट्रात जातीय वनवा भडकेल त्याची संपूर्ण जबाबदारी अर्थातच सरकारवर असेल. आपल्या खुर्च्या शाबूत राखण्यासाठी आणि पक्षाचे जनाधार वाढवण्यासाठी सरकारने महाराष्ट्राला जातीय वनव्याच्या आगीत ढकलू नये असे महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला वाटते अजूनही वेळ गेलेली नाही दोन्ही कडच्या नेत्यानं आवरा ते जर काही स्फोटक विधाने करीत असतील तर त्यांच्यावर तात्काळ कारवाई करा त्यांच्या सभांना परवानगी देऊ नका. रस्त्यावर उतरले तर त्यांच्यावर तितक्याच ताकतीने पोलिसीबळाचा वापर करा, पण या क्षणी ओबीसी किंवा मराठा समाजातील दंगलखोरांची गय करू नका. आरक्षणासाठी रस्त्यावर उतरलेल्या मराठा समाजातील सगळेच काही दंगलखोर आहेत असं आम्ही म्हणत नाही, परंतु अशा पेटलेल्या वातावरणात काही समाजकंटक घुसतात आणि प्रक्षेप वाढवतात जाळपोळ करणारे ओबीसी किंवा मराठा असू शकत नाही तर या दोन्ही समाजाच्या मध्ये घुसलेले काही समाजकंटक आहेत. त्यामुळे अशा समाजकंटकांना संधी देऊ नका हेच महाराष्ट्रातील साडेबारा कोटी जनतेचे म्हणणे आहे.

### विकसित भारत संकल्प यात्रा अभियान जनआंदोलनाद्वारे यशस्वी करावे - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवून भारत विकसित करण्याचे शासनाचे उद्दिष्ट



**मुंबई/प्रतिनिधी**

विकसित भारत संकल्प यात्रेत नागरिकांनी सहभागी होऊन याला जन आंदोलनाचे रुप द्यावे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यासाठी संकल्प यात्रा सुरू करण्यात आली आहे. महिला, युवा, शेतकरी आणि गरीब हे समाजातील अमृतस्तंभ असून, यांचा विकास हाच शासनाचा ध्यास आहे. या चार वर्गाच्या विकासाद्वारे भारताचा विकास साधण्यासाठी नागरिकांनी सहभाग नोंदवून विकसित भारत संकल्प यात्रा अभियान' यशस्वी करण्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले. आज विकसित भारत सकंल्प यात्रेअंतर्गत सहभागी झारखंड, अरुणाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, ओडिशा, आंध्र प्रदेश या राज्यातील लाभार्थ्यांसोबत प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे संवाद साधला.

१५ नोव्हेंबर २०२३ ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत या यात्रेचे महाराष्ट्रात आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील दहा महानगरपालिकांची निवड करण्यात आली असून, त्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेचा देखील समावेश आहे. या उपक्रम अंतर्गत बृहन्मुंबईतील २२७ प्रभागांमध्ये विशेष अशा चार वाहनांद्वारे २८ नोव्हेंबर २०२३ ते १ जानेवारी २०२४ पर्यंत या यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मुंबईतील डी' वॉर्ड कार्यालयात मुंबई शहरचे पालक मंत्री तथा मंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री तथा मंत्री मंगलप्रभात लोढा, केंद्रिय कृषी विभागाचे सचिव मनोज आहुजा, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, महानगरपालिकेच्या नियोजन विभागाच्या संचालक डॉ. प्राची जांभेकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, डी' विभागाचे सहायक आयुक्त शरद उघडे उपस्थित होते. प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे कळ दाबून ड्रोन दीदी' आणि प्रधानमंत्री भारतीय जन औषधी योजना' यांचे उद्घाटन केले. यावेळी या दोन्ही योजनांवर आधारित चित्रफिती दाखविण्यात आल्या. जन औषधी केंद्र २५ हजार करण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट असल्याचे प्रधानमंत्री यांनी सांगितले. प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधताना त्यांना शुभेच्छा दिल्या आणि केंद्र शासनाच्या योजनांची माहिती इतर गावांमधे पोहोचविण्याचे आवाहन केले. कृषी क्षेत्रात ड्रोनचे महत्व असून, याद्वारे कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढणार आहे. महिलांचे सक्षमीकरण करण्यासही मदत होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महिलांचा या योजनांमधला सहभाग प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. १५ हजार ड्रोन वितरित करण्यात आले आहेत. महिला बचत गटांच्या सहायाने महिलांना ड्रोन पायलटचे प्रशिक्षण देण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच माय भारत अभियानातही सहभाग नोंदविण्याचे त्यांनी यावेळी आहवान केले. प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, जनजाती दिवसानिमित्त सुरू झालेली संकल्प यात्रा देशातील १२ हजार पेक्षा जास्त ग्रामपंचायतींमधे पोहचली आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात यामधे सहभाग नोंदविला असून, या यात्रा अभियानाला जनआंदोलनाच्या रूप देऊन भारताच्या विकासात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित नागरिकांना केले. प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, सेवाभावाने कार्य करून देशातील सर्व गावांमधे या यात्रेद्वारे शासकीय योजना पोहचविण्याचे काम केंद्र शासन करीत आहे. शेतीला आधुनिक बनविणे, जनतेला कमीत कमी दरात औषधांचा पुरवठा करणे, युवकांना रोजगार देणे तसेच गरीबांना मोफत राशन देण्याचे कार्य केंद्र शासन करीत असल्याचेही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधताना सांगितले.

**यात्रेचे उद्दष्टि** : मुंबईतील २२७ ठिकाणांवर ही चार वाहने फिरणार असून विविध योजनांसाठी पात्र असलेल्या परंतु लाभापासून वंचित असलेल्या घटकांपर्यंत केंद्र शासनाच्या आयुष्मान हेल्थ कार्ड, उज्ज्वला योजना, पीएम स्वनिधी योजना, आधार कार्ड आदी विविध योजनांची माहिती पोहोचविणे व त्याबाबत जागृती करणे. शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधणे, निश्चित केलेल्या पात्रतेनुसार संभाव्य लाभार्थी यांची यात्रेमध्ये नोंदणी करणे आदी या यात्रेची उद्दिष्टे आहेत. या यात्रेदरम्यान विविध योजनांचे लाभार्थी या वाहनांना भेट देऊन थेट लाभ घेऊ शकतात. ही यात्रा राज्यातील एकूण ४१८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थातील २०८४ परिसरातून फिरणार आहे.

### अवकाळीग्रस्त भागाला सर्व पालकमंत्री भेट देणार
### सर्व जिल्ह्यांचे पंचनाम्यांचे प्रस्ताव एकत्रित सादर करा
## शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणार- मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांत राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस,गारपीट यामुळे शेती आणि फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुमारे १ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नसून ३ हेक्टरपर्यंत नुकसानभरपाई देण्यात येईल, यासाठी महसूल, कृषी विभागाने तातडीने कालबध्द रितीने एकत्रितरित्या सर्व जिल्ह्यांचे पंचनामे पूर्ण करावेत असे निर्देश आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील यासंदर्भात प्रशासनाने युद्ध स्तरावर काम करावे अशा सूचना दिल्या.आज मदत व पुनर्वसन तसेच कृषी विभागाने राज्यातील पडलेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीट याबाबत सादरीकरण केले. पंचनामे प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे तातडीने करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकारी यांनी सर्व क्षेत्रीय यंत्रणांना द्यावेत व ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झालेल्या प्रकरणी निधी मागणीचा प्रस्ताव तत्काळ शासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी, असे औपचारिक निर्देश महसूल व वन (आपत्ती व्यवस्थापन) विभागाने सर्व जिल्हाधिकारी यांना कालच दिल्याची मंत्रिमंडळाने नोंद घेतली. राज्यातील बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देण्याकरिता निधी मागणीचे प्रस्ताव सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त करून घेऊन निधी वितरित करण्याचे एकत्रित प्रस्तावावर विभागाने तातडीने निर्णय घेण्याचे निर्देश मंत्रिमंडळाने यावेळी दिले. ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड हे तालुके बाधित असून यातील ५३ हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे., पालघर जिल्ह्यातील पालघर, वसई व डहाणू तालुक्यातील ४१ हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे, नाशिक जिल्ह्यातील कळवण, नांदगाव, नाशिक, निफाड, त्र्यंबकेश्वर, सटाणा, दिंडोरी, पेठ, सुरगाणा, इगतपुरी, सिन्नर, चांदवड, येवला तालुक्यातील ३२ हजार ८३३ हेक्टर क्षेत्रातील कांदा, द्राक्ष, सोयाबीन, मका, गहू, ऊस व फळपिके, धुळे जिल्ह्यातील साक्री, शिरपूर, शिंदखेडा तालुक्यातील ४६ हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई, कापूस, हरभरा, नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर, अक्कलकुवा, नंदुरबार, शहादा, तळोदा, अक्राणी तालुक्यातील २ हजार २३९ हेक्टर क्षेत्रातील भात, कापूस, तूर, मिरची, मका, कांदा पिकांचे, जळगाव जिल्ह्यातील जळगाव, भुसावळ, यावल, रावेर, मुक्ताईनगर, अमळनेर, चोपडा, एरंडोल, पारोळा, चाळीसगाव, जामनेर, पाचोरा, धरणगाव, बोदवड, भडगाव तालुक्यातील ५५२ हेक्टर क्षेत्रातील कांदा, हरभरा, गहू, मका, ज्वारी व फळपिकांचे नुकसान झाले. अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर, अकोले, कोपरगाव, पारनेर, राहाता येथील १५ हजार ३०७ हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई, मक्याचे नुकसान झाले आहे. पुणे जिल्ह्यातील खेड, आंबेगाव, शिरुर तालुक्यातील ३ हजार ५०० हेक्टर क्षेत्रातील द्राक्ष, कांदा पिकांचे नुकसान झाले आहे, सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील १५ हेक्टर क्षेत्रातील भात पिकाचे नुकसान झाले आहे., छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील संभाजीनगर, पैठण, गंगापूर, वैजापूर, कन्नड, खुलताबाद, सिल्लोड, सोयगाव आणि फुलंब्री तालुक्यातील ४ हजार २०० हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई व मका पिकांचे नुकसान झाले आहे, जालना जिल्ह्यातील बदनापूर, जालना, जाफराबाद तालुक्यातील ५ हजार २७९ हेक्टर क्षेत्रातील द्राक्ष, केळी, कांदा, खरीप ज्वारी, गहू व हरभरा पिकांचे नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यातील परळी, बीड तालुक्यातील २१५ हेक्टर क्षेत्रातील कांदा, ज्वारी, भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे, हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील १०० हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे.

परभणी जिल्ह्यातील परभणी, गंगाखेड, जिंतूर, पाथरी, पूर्णा, पालम मानवत सोनपेठ, सेलू तालुक्यातील १ हजार हेक्टर क्षेत्रातील रब्बी ज्वारी, कापूस, सीताफळ, पेरू, भाजीपाला या पिकांचे नुकसान झाले आहे, नांदेड जिल्ह्यातील नांदेड, मुदखेड तालुक्यातील ५० हेक्टर क्षेत्रातील केळी पिकाचे नुकसान झाले आहे, बुलढाणा जिल्ह्यातील बुलडाणा, नांदुरा, लोणार, सिंदखेडराजा, देऊळगाव राजा, संग्रामपूर, मेहकर, जळगाव जामोद, मलकापूर, खामगाव, शेगाव, मोताळा, नांदुरा तालुक्यातील ३३ हजार ९५१ हेक्टर क्षेत्रातील भाजीपालाचे नुकसान झाले आहे.

### राज्यात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान
## शाळांचे मूल्यांकन करणार पहिल्या टप्प्यात ४७८ शाळा

**मुंबई/प्रतिनिधी**

शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण मिळावे म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. पहिल्या टप्प्यात ४७८ शाळांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातल्या सर्व व्यवस्थापनांच्या तसेच सर्व माध्यमांच्या शाळा या अभियानात सहभागी असतील. बृहन्मुंबई महानगरपालिका, वर्ग-अ आणि वर्ग-ब महानगरपालिका शाळा, उर्वरित महाराष्ट्र अशा ३ स्तरांवर हे अभियान राबविण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याबरोबरच शिक्षणासाठी आवश्यक आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देण्यात येईल. क्रीडा, आरोग्य, स्वच्छतेचे महत्व, राष्ट्रप्रेम, व्यावसायिक शिक्षणाचे महत्व तसेच शाळेविषयी कृतज्ञतेची भावना निर्माण करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट राहील. ४५ दिवसांमध्ये हे अभियान राबवायचे आहे. या अभियानातील शाळांसाठी विद्यार्थी केंद्रीत उपक्रम, शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित उपक्रम यासाठी मिळून १०० गुण असतील. शाळांचे मुल्यांकन करण्यासाठी महानगरपालिकांच्या स्तरावर विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखालील तर उर्वरित महाराष्ट्रासाठी केंद्र प्रमुखाच्या अध्यक्षतेखाली मुल्यांकन समिती असेल. याशिवाय तालुका, जिल्हास्तरांवर देखील गटविकास अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समित्या राहतील. प्रत्येक विभागातून सर्वोत्तम कामगिरी बजावलेल्या शाळांची पहिल्या ३ क्रमांकासाठी निवड करण्यात येईल. याकरिता शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समिती राहील. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील तसेच अ व ब वर्ग पालिका क्षेत्रातील शाळांना पहिले पारितोषिक २१ लाख, दुसरे पारितोषिक ११ लाख, तिसरे पारितोषिक ७ लाख मिळेल. तर उर्वरित महाराष्ट्रामधील शाळांना देखील तालुका,जिल्हा तसेच विभागनिहाय पारितोषिके मिळतील. राज्यस्तरावर तसेच सर्व व्यवस्थापनांच्या शाळासाठी पहिले पारितोषिक ५१ लाखाचे असून दुसरे पारितोषिक २१ लाख आणि तिसरे ११ लाखाचे असेल. या अभियानासाठी २० कोटी ६३ लाख रुपये खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

## सफाई कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक

राज्यातील सफाई कामगारांच्या सुविधांसाठी राज्य शासनाने लाड-पागे समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत विविध संघटनांकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनातील मागण्यानुसार सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणाऱ्या सर्व सफाई कामगारांना लाड समितीच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सफाई कामगारांच्या विविध मागण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. आज मंत्रालयात मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सफाई संवर्गातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या लाड पागे समिती शिफारशींबाबत बैठक घेण्यात आली. मंत्री श्री. देसाई म्हणाले की, सफाई कामगारांच्या विविध मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील समितीने याबाबत निर्णय घेतला आहे. यासंदर्भात वारसा हक्काबाबत पूर्वीचे सर्व शासन निर्णय रद्द करून एकत्रित नवीन शासन निर्णय काढण्यात आला आहे. या निर्णयाबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. सफाई कामगारांना लाड - पागे समितीच्या शिफारशीबाबत न्यायालयाच्या स्थगितीबाबत सामाजिक न्याय विभागाने पाठपुरावा करून शासनाची बाजू मांडावी, अशा सूचना मंत्री देसाई यांनी यावेळी संबंधितांना दिल्या. समन्वय समितीने आंदोलन करू नये, असे आवाहन मंत्री श्री. देसाई यांनी यावेळी केले. या बैठकीस समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, नगर विकास विभागाचे उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर, सामाजिक न्याय विभागाचे उपसचिव र.शि.गोरवे तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी,समन्वय समितीचे सदस्य उपस्थित होते.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहीर!

नवी मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि परीक्षा घेणाऱ्या इतर संस्थांच्या परीक्षा एकाच दिवशी येणार नाही व उमेदवारांचे नुकसान होणार नाही. या उद्देशाने विधीमंडळात देण्यात आलेल्या आश्वासनानुसार सन २०२४ मध्ये आयोगातर्फे आयोजित स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक निश्चित केल्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबईचे उप सचिव दे.वि.तावडे यांनी कळविले आहे. शासनाच्या मागणीनुसार शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या वेळापत्रकात स्पर्धा परीक्षांचे नाव, जाहिरातीचा दिनांक, पूर्व परीक्षेचा दिनांक, पुर्व परीक्षेच्या निकालाचा महिना, मुख्य परीक्षेचा दिनांक, मुख्य परीक्षेच्या निकालाचा महिना या सर्व बाबी सविस्तरपणे नमूद करण्यात आल्या आहेत. हे वेळापत्रक आयोगाच्या https://mpsc.gov.in व https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. हे वेळापत्रक अंदाजित असून जाहिरातीच्या अथवा परीक्षेच्या प्रस्तावित महिना किंवा दिनांकामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होऊ शकतो.असे बदल झाल्यास ते वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. या परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत विधीमंडळातील वारंवार झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावित वेळापत्रक निश्चित करतांना कोणत्याही परीक्षा एकाच दिवशी येणार नाही. याची आयोगामार्फत दक्षता घेण्यात आली आहे. संघ लोकसेवा आयोग, विविध विद्यापीठे, परीक्षा घेणाऱ्या इतर संस्थांना प्रस्तावित वेळापत्रकाची प्रत पाठवून या संदर्भात दक्षता घेण्याची विनंती आयोगामार्फत करण्यात आली आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

04 TO 10 DECEMBER 2023 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 12/2/2023 10:44 PM Page 1



# सफाळे रामबाग जवळ तीन दुचाकींचा विचित्र अपघात; एक ठार, तीन जण जखमी



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर तालुक्यातील सफाळे रामबाग येथे आज सकाळी तीन दुचाकींचा विचित्र अपघात झाला. या अपघातात विळंगी गावातील दुचाकीस्वार विक्रम कमलाकर पाटील (२१) याच्या मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले. दोन दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाल्याने आज पहाटे जिल्ह्याच्या विविध भागात दाट धूके पसरले होते. मृत झालेला दुचाकी स्वार विक्रम हा मुंबईत रात्रपाळी करुन सफाळेहुन विळंगी कडे जात असताना रामबाग जवळ धुक्यामुळे समोर काही न दिसल्याने दुचाकीला धडक दिली. याचवेळी पाठीमागून येणाऱ्या तिसऱ्या दुचाकी चालकांनी दोन दुचाकीला धडक दिली. त्यामुळे हा तीन दुचाकींचा विचित्र अपघात झाला. या अपघातात विक्रांत पाटील हा जखमी अवस्थेत असताना सफाळे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी उपचारादरम्यान मृत घोषित केले. त्याचप्रमाणे विलंगी गावातून येणारे प्रकाश गजजान किणी (५८), पल्लवी प्रकाश किणी (४६) हे पती-पत्नी व माकुणसार येथील जयदीप वर्तक गंभीर जखमी झाले. या अपघाताची माहिती सफाळे पोलीसांना मिळतात घटनास्थळी तात्काळ दाखल होऊन जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सफाळे पोलीस ठाण्यात अपघाती नोंद करण्यात आली.

# भिवंडीत स्वस्त व हक्काची घरे मिळवून देण्याचे अमिष दाखवून तबब्ल १७५ कोटींची फसवणूक

## व्याजासह पैसे परत मिळण्याची गुंतवणूकदारांची मागणी

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडीतील ग्रामीण भागात नवीन ठाणे बनवणार असून या नवीन ठाण्यात नागरिकांना स्वस्त व हक्काची घरे मिळवून देण्याचे अमिष दाखवून सुमारे ४ हजारांहुन अधिक गरीब नागरिकांची तब्बल १७५ कोटी रुपयांहुन अधिकची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार भिवंडीत समोर आला आहे. याप्रकरणी नागरिकांनी केलेल्या तक्रारी अर्जाची दखल राज्याच्या गृह विभागाने घेत व्यावसायिकाची मालमत्ता सील करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र राज्य शासनाच्या आदेशानंतर ही गुंतवणूकदारांना कोणताही मोबदला अथवा रकमेचा परतावा मिळाला नसल्याने गुंतवणूकदारांचे पैसे व्याजासह लवकरात लवकर परत मिळावे अशी मागणी या गुंतवणूकदारांनी भिवंडीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली आहे. भिवंडीतील अंजुर फाटा चिंचोटी महामार्गावर असलेल्या मालोडी, खार्डी, पाये,पायगाव परिसरात नवीन ठाणे बसणार असून या ठिकाणी स्वस्तात घरे मिळणार असल्याचे आमिष महावीर पटवा या बांधकाम व्यावसायिकांनी नागरिकांना २०१२ मध्ये दाखविले होते.विविध ठिकाणी याबाबतच्या जाहिराती महावीर पटवा यांनी केल्या होत्या. या जाहिरातींना भुलून सुमारे ४ हजारहुन अधिक नागरिकांनी या बांधकाम प्रकल्पात पैशांची गुंतवणूक केली होती मात्र महावीर पटवा बांधकाम प्रकल्पाचे व्यवसायिक राजेश पटवा यांनी गृह प्रकल्प अर्धवट सोडून गुंतवणूक दारांचे सुमारे १७५ कोटी रुपये हडप केले. याबाबत महावीर पटवा बांधकाम व्यावसायिका विरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यास अटक देखील करण्यात आली होती. यानंतर गुंतवणूकदारांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे व राज्य शासनाकडे देखील तक्रार दाखल केली होती. यासंदर्भात राज्याच्या गृह विभागाने १० नोव्हेंबर २०२३ रोजी महावीर पटवा बांधकाम व्यवसायिकाची मालमत्ता सील करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकल्पात गुंतवणूक करणारे अनेक गुंतवणूकदार गरीब असल्याने अनेकांनी आपल्या आयुष्याची जमापुंजी या प्रकल्पासाठी दिली आहे तर अनेकांना घर मिळाले नाही मात्र संपूर्ण हफ्ते भरले आहेत त्यामुळे गुंतवणूकदार मेटाकुटीला आले आहेत. त्यामुळे २०१२ पासून आम्ही भरलेल्या रकमेवर बँकेने व्याज वसूल केला असल्याने आमचे पैसे आम्हाला व्याजासह परत मिळावे अशी मागणी या गुंतवणूकदारांनी केली आहे.संदर्भातील लेखी निवेदन देखील गुंतवणूकदारांनी भिवंडी प्रांताधिकारी कार्यालयात दिले आहे. दरम्यान २०१३-१४ साली मी या प्रकल्पात तीन रूमचे घर घेतले होते ज्याचा ताबा २०१६ साली बांधकाम व्यवसायिक देणार होता यासाठी नऊ लाख रुपये रोखीने भरले होते मात्र अजूनही आम्हाला ना घर मिळाले ना आमचा पैसा अशी प्रतिक्रिया गुंतवणूकदार नितीन मोहिते यांनी दिली आहे. २०१४ साली आम्ही दोन रूमचे घर या प्रकल्पात घेतले होते त्यासाठी दहा लाख रुपये भरले आहेत. या घराचा ताबा बांधकाम व्यवसायिक आम्हाला २०१९ रोजी देणार होता मात्र आजपर्यंत आम्हाला काहीच मिळाले नाही अशी प्रतिक्रिया ठाणे येथील रहिवासी व गुंतवणूकदार राजेंद्र पराडकर यांनी दिली आहे. मी इन्शुरन्स कंपनीत कामाला असून २०१२ मध्ये या प्रकल्पात वन बीएचके घर घेतले होते, ज्याचा ताबा २०१४ साली मिळणार होता. यासाठी ५ लाख ८० हजार रुपये भरले असून आमच्या घराचे रजिस्ट्रेशन देखील झाले आहे. मात्र अजूनही आम्हाला घर मिळालेले नाही असे जितेंद्र बिडकर यांनी प्रतिक्रीया दिली आहे.

# सोलापूर जिल्हा परिषदेत संविधान दिन साजरा



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त जिल्हा परिषदेतील संविधान प्रास्ताविकेच्या शिलालेखास शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले, पत्रकार शेखर गोतसुर्वे, जिल्हा कृषी अधिकारी नंदकुमार पाचकुडवे, राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज, डॉ.पाथरुडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी प्रास्ताविक युनियनचे अध्यक्ष तजमुल मुतवली, सूत्रसंचालन डॉ. एस.पी. माने, तर आभार प्रदर्शन श्रीशैल देशमुख यांनी केले. याप्रसंगी युनियनचे सर्व पदाधिकारी व प्रमुख सदस्य प्रताप रुपनवर, संतोष शिंदे, अजित कुमार देशमुख, जाफर शेख, चेतन वाघमारे, नरसिंह गायकवाड, गोपीचंद नारायणकर, मिलिंद शिंदे, तानाजी होटकर, संजय कुंभार, महेश सुतार, कल्याण श्रावस्ती, सुरेश साळुंखे, महादेव लोणारी, प्रानेश ओहळ, विजय हराळे, केवल सुलाने उपस्थित होते.

## ट्रॅक्टरमध्ये पाय अडकून शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

पालघर : शेतात नागंरणी करत असताना ट्रॅक्टर मध्ये पाय अडकून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. सदानंद मारले असे या शेतकऱ्याचे नाव असून त्याच्यावर मागील आठवड्यापासून मीरा रोड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. २० नोव्हेंबर रोजी पालघर जिल्ह्यातील मनोर येथे सदानंद मरले (३२) हा शेतकरी आपल्या शेतात नांगरणीसाठी ट्रॅक्टरने पेरणी करत होता. बांधावरील गवत ट्रॅक्टर मध्ये अडकले तेव्हा मरले याचा पाय गवतावर असलेला डावा पाय ट्रॅक्टर मध्ये अडकला. ट्रॅक्टचा मागील भाग तोडून त्याचा पाय काढण्यात आला. मात्र तो पर्यंत मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला होता. त्याला उपचारासाठी सुरवातील मनोर येथील खासगी रुग्णालयात आणि नंतर पुढील उपचारासाठी काशिमीरा येथील खासगी रुग्णालया हलविण्यात आले. उपचारादरम्यान रात्री दहाच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला.

# राज्यस्तरीय ओएमआर यु.जी. परिषदेत श्रेया बहीर व आदिती दर्डा यांना प्रथम पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी**



इंडियन अकॅडमी ऑफ ओरल मेडिसिन ॲण्ड रेडिअेलॉजी (IAOMR) यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'ओएमआर पदवी परिषद २०२३' मध्ये लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील ओरल मेडिसिन ण्ड रेडिओलॉजी विभागातील बी.डी.एस. आंतरवासीता विद्यार्थीनी श्रेया सदाशिव बहीर यांच्या पुनरावलोकन लेखास व आदिती प्रशांत दर्डा यांच्या निबंध लेखनास प्रथम पुरस्कार मिळाला तर डॉ. रोहिणी शिरीष दिवेकर यांना छायाचित्र स्पर्धेत व्दितीय पुरस्कार मिळाला आहे. पुणे येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राज्यस्तरीय 'ओएमआर पदवी परिषदेत ओरल मेडिसिन ॲण्ड रेडिओलॉजी विभागातील बी.डी.एस. आंतरवासीता विद्यार्थीनी श्रेया बहीर हिने 'लिक्विड बायप्सी इन ओरल कॅन्सर' या विषयावर सादर केलेल्या पुनरावलोकन लेखास प्रथम पुरस्कार मिळाला व आदिती दर्डा हिने 'ओरल मेडिसिन ण्ड रेडिओलॉजी: व्युव्हज ण्ड काऊंटर व्युव्हज' या विषयावर सादर केलेल्या निबंधासही प्रथम पुरस्कार मिळाला आहे तर डॉ. रोहिणी दिवेकर यांनी 'वल्ड इन सेपिया टोन्स' या विषयावरील सादर केलेल्या छायाचित्रास व्दितीय पुरस्कार मिळाला आहे. त्याचबरोबर या परिषदेत सिनियर लेक्चर डॉ. प्रियंका बसवराज लासुणे, आंतरवासिता विद्यार्थी अबोली अतुल पाचपोळ, गायत्री शेषेराव राऊत यांनी वेगवेगळ्या विषयावर पेपरचे सादरीकरण करुन सहभाग नोंदवला. तसेच या परिषदेतील वैज्ञानीक सत्रात परिक्षक म्हणून डॉ. रोहिणी दिवेकर यांनी काम पाहिले. या परिषदेतील सहभागी विद्यार्थी व शिक्षक कर्मचाऱ्यांना विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी माले यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थी व शिक्षक कर्मचाऱ्यांचे महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी माले यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

# भिवंडीत अतिक्रमणावर वन विभागाचा हातोडा

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडीत गोदाम व्यवसाय मोठ्या प्रमाणात फोफावला असून एका बांधकाम व्यावसायिकाने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गोदाम बांधकामासाठी चक्क वनविभागाच्या जागेत अतिक्रमण केले असल्याची बाब समोर आल्या नंतर वन विभागाने जेसीबी मशीन व पोकलेनच्या साहाय्याने सदर जागेवरील बांधकाम व्यवसायिकाच्या अतिक्रमणावर कारवाई केली आहे. हितेंद्र राठोड असे वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाचे नाव आहे. हितेंद्र राठोड याने वालशिंद एलकुंदे परिसरात गोदाम बांधकामासाठी त्याच्या खासगी जागे लगत असलेल्या वनविभागाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले होते. वन विभागाच्या जागेवर गोदाम बांधकाम करण्यासाठी विकासकाने पक्क्या स्वरूपातील कॉंक्रेट भिंत बांधून वन विभागाची जागा हडप केली होती. सदर बाबत वनविभाग पडघा वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी जेसीबी पोकलेन मशीनच्या सहाय्याने हे अतिक्रमण हटवले आहे. याप्रकरणी पडघा वन विभागाने स्थानिक पोलीस ठाण्यात अद्यापपर्यंत कोणताही अहवाल नोंदवला नाही.

# डायबेटीस हा सायलेंट किलर आहे -डॉ.रेश्मा बनसोडे



**वसई/प्रतिनिधी**

डायबेटीसचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून डायबेटीस हा सायलेंट किलर आहे, असे मत डॉ. रेश्मा बनसोडे यांनी ज्येष्ठ नागरीक संघ व जनरल प्रॅक्टीस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक मधुमेह निमित्त २४ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित कार्यक्रमात केले.

यावेळी डॉ. रमेश बनसोडे, अनिल वनमाळी, डॉ. प्रदीप जाधव, डॉ. पंडित व्यासपीठावर उपस्थित होते. ज्येष्ठ नागरीकांच्या डायबेटीसबाबत समस्या व त्यावरील उपाय या विषयी डॉ. रेश्मा बनसोडे यांनी सखोल मार्गदर्शन केले. भारताचा जगात 'डायबेटीस' बाबत दुसरा नंबर असून ही खूप गंभीर समस्या बनली आहे. डायबेटीसबाबत व डॉक्टरांनी सुचवलेल्या तपासण्या वेळेवर करा. डायबेटीस खूप प्रमाणावर वाढल्यास त्याचा परिणाम शरीरावरील विविध अवयवावर होतो व हे रुग्णाला कळून येत नाही हा 'सायलेंट किलर' आहे. याबाबत जागरुक असणे खूपच गरजेचे आहे. गुळ, मध, शुगर फ्री मिठाई हे सर्व साखरेचा समान ग्लायसेमीक इंडेक्स असणारे पदार्थ आहेत व याबद्दल अनेक गैरसमज आहेत उपस्थित नागरीकांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारकरित्या उत्तरे डॉ. रेश्मा बनसोडे यांनी दिली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. रेश्मा बनसोडे यांच्या टिमचे सदस्य अंकीत (लुपीन फार्मा), आनंद (युएस. व्ही. फार्मा), देवेंद्र (मायक्रो लॅबस), विशाल (मकलेड फार्मा) यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरीकांची मधुमेह तपासणी केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. प्रदीप जाधव यांनी केले. या कार्यक्रमात व्ही. एन. एस. चॅनलचे देवेंद्र खन्ना व पत्रकार आनंद गदगी उपस्थित होते.

## वसईत इसमाचा मृतदेह आढळला; नातेवाईकांचा शोध सुरू



वसई : वसई पोलीस ठाणे हद्दीत दीड १८/०८/२०२३ रोजी स्टेटस हॉटेलच्या समोर पापडी वसई रोड येथे इसमाचा पडलेल्या अवस्थेत आढळला. वसई पोलिसांनी त्याला तत्काळ सरकारी सर डी.एम.पेटीट रूग्णालयात दाखल केले असता तेथील कर्तव्यावरील डॉक्टरांनी दाखला पुर्व मयत झाल्याची घोषणा केली. पोलीस ठाण्यात अपमुत्यू नं.रजि नं ५७/२०२३ दाखल केला आहे. या मयत इसमाचे नाव सिराज शेख बांगाली वय ५० पुर्ण नाव पत्ता माहीत नाही. इसमाचे वर्णन पुढील प्रमाणे अंगात वेगळ्या रंगाचा पट्ट्यांचा शर्ट जिन्स पॅन्ट दांडी वाढलेला, मयत इसम असून या इसमा बद्दल कोणास काही माहिती मिळाली तर वसई पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. याचा तपास पोलीस उपनिरीक्षक एम के वडणे करीत आहेत.


## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'डी' आचोळे, नालासोपारा (पु.)**
**(दुरध्वनी क्रमांक ७२१९३७०००६/७२१९३७०००९)**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | आचोळे ०५ | १४८/९ | ३२३९ | महादेव विठ्ठलराव चांदोरे | अभिषेक उमाशंकर गुप्ता |
| २. | आचोळे १० | ५२/२७ | ३२४३ | अशोक चंद्रसेन | ओमकार नरेंद्र जोशी व गुंजन जयेश जोशी |
| ३. | आचोळे ०८ | १८१/२३ | ३२४७ | इदरीश अब्बास शेख | प्रतिमा रघुनाथ जाधव |
| ४. | आचोळे ९/१ | ६४८/७६ | ३२४९ | निरज पाटील | जिगर वीरेंद्र मीस्त्री व प्रीती वीरेंद्र मीस्त्री |
| ५. | माणिकपूर२/२ | AC२०/३५८०८ | ३२५६ | अनिता देशमुख | छोगाराम चौधरी व मंजु छोगाराम चौधरी |
| ६. | आचोळे ०५ | ६३/५४ | ३२५८ | जतिन मंगेश कांबळे | बन्सीलाल परदेशी गुप्ता व ज्ञान्ती बन्सीलाल गुप्ता |
| ७. | आचोळे ०५ | ६३/२५ | ३२६० | ॲन्थोनी फ्रान्सीस मंतेरो | रमेश नामदेव डिंगणकर व समीक्षा रमेश डिंगणकर |
| ८. | आचोळे ०४ | १४८/१९ | ३२६२ | चंद्रकांत धोंडू सारंग | प्रशांत विजय कांटळकर |
| ९. | आचोळे ०६ | २७०/३ | ३२६४ | राधादेवी राजकिशोर सिंह | ईच्छाराम लल्ला विश्वकर्मा |
| १०. | आचोळे ०९ | ८०६/२६ | ३२६५ | राजेन्द्र कुमार रामबली यादव | आमीन मनुलाल शेख |
| ११. | आचोळे ०९ | ८०६/२७ | ३२६७ | राजेन्द्र कुमार रामबली यादव | आमीन मनुलाल शेख |
| १२. | आचोळे ०८ | १७५/३४ | ३२७० | किशोर कुमार जी चोवटीया | प्रभाकर सहदेव मांडवकर व सुवर्णा प्रभाकर मांडवकर |
| १३. | आचोळे ९/१ | ४९७/३५ | ३२७८ | सरीना नितीन डायस | रविंद्र हरिवंश सहदेव ठाकुर व शिवकुमारी रविंद्र ठाकुर |
| १४. | आचोळे ०२ | १५/१९ | ३२८२ | सुद्रा कांतीलाल विरंजीभाई | राजन वसंत परब |
| १५. | आचोळे १० | ४५६/७ | ३२९७ | राजु थामस चक्कालाक्कल | अंजली अनंत महाडीक व अनंत शंकर महाडीक |
| १६. | आचोळे १० | ५/३१ | ३२९८ | स्टार लॅन्ड प्रा.लि. | विरप्रताप हौसलाप्रसाद मिश्रा |
| १७. | आचोळे ०६ | २८४/२० | ३२९९ | अमिना ए. शेख | शशिकांत शिवराम खाडेकर व शिवानी शशिकांत खाडेकर |
| १८. | आचोळे ०९ | ६१२/३६ | ३३११ | शिवलाल पाचू गुप्ता | माला पवन गुप्ता |
| १९. | आचोळे ९/१ | ४९७/१७ | ३३१७ | सरीना नितीन डायस | रवीन्द्र हरिवंश ठाकुर व शिवकुमारी रवींन्द्र ठाकुर |
| २०. | आचोळ ०२ | १९८/३० | ३३१८ | ज्योती कृष्णा झगडे | संतोष भास्कर घाडीगावकर व संजना संतोष घाडीगावकर |

जावक क्र. वविशम/कवि/२५२१/२०२३-२०२४
दिनांक : २९/११/२०२३

सही/-
**प्र. सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'डी' आचोळे
वसई विरार शहर महानगरपालिका

पान १ वरून....

## गुंतवणूकदरांची फसवणूक करून ...

त्याचा पाठलाग करत त्याला संभाजीनगरमधून ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीत त्याने हत्या का व कशी केली? याचा उलगडा होऊ शकेल असे पोलिसांनी सांगितले. जोपर्यंत आरोपीला अटक करत नाहीत तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका नातेवाइकांनी घेतल्याने पोलिसांसमोर आरोपीला पकडण्याचे आव्हान होते. आई आणि मुलाचा आज २ डिसेंबर रोजी वाढदिवस होता. यासाठी ५ किलोच्या केकची ऑर्डर आईने दिली होती. नातेवाईकांना वाढदिवसांसाठी बोलवताना ती प्रचंड आनंदात होती. मात्र, वाढदिवसाचा केक आणण्यापूर्वीच तीने मुलासह जगाचा निरोप घेतला. आई मुलाचा जन्मदिवस आणि शेवटचा दिवस एकच ठरल्याने नातेवाइकाच्या दु:खाला पारावार उरला नव्हता.

## प्रेयसीच्या आई-वडिलांना जाळून...

लाभलेली तरुणी होती. त्यामुळे अनेकांच्या नजरा तिच्याकडे भिरभिरत असत. याच परिसरात राहणारा यशवंत बाबुराव शिंदे हा तरुणही तिच्या सौदयावर फिदा झाला होता, त्याने ही तिला पटवण्यासाठी कंबर कसली होती. ती आपल्या जाळ्यात अडकवी म्हणून तो रोज तिच्या घराभोवती घिरट्या घालत असे. अखेर यशवंत याने रेहना हिला पटवली. दोघेही एकमेकांना भेटु लागले. यातून यशवंत आणि रेहना मैत्रीच्या बंधनाला तोडून प्रेमाच्या रेशमी कोशात अडकले. मैत्री, सहवास, हुरहुर, विरह या भावनांच्या आंदोलनातून ते केव्हा प्रेमाच्या मायावी हिंदोळ्यावर बसून झोके घेऊ लागले, हे त्यांना ही कळलंच नाही. पुढे पुढे दोघांची मैत्री वाढत गेली. त्यातून त्यांच्या गाठीभेटी होत गेल्या. दोघेही एकमेकांवर मनापासून प्रेम करू लागले. त्यामुळे दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. मात्र तिच्या घरच्यांना हे लग्न मान्य नव्हत. कारण दोघेही भिन्न समाजाचे असल्याने हा विवाह होणे कदापि शक्य नव्हतं. परंतु यशवंत हा जिद्दीला पेटला होता.रेहनावर तो प्रेम करीत असल्याने आणि तीही यशवंतला चाहत असल्याने त्यांना एकमेकांनपासून दूर करणे शक्य नव्हते. इकडे मुलगी वयात आल्याने तिच्या आई-वडिलांनी रेहनासाठी वरसंशोधन सुरू केले होते.योग्य वयात लग्न झालेले चांगलं असत. त्यात ती यशवंत च्या प्रेमात पडल्याने घरच्यांनी रेहणाचा लग्न करण्याचा निर्णय घेतला.तिच्या वडिलांनी मुंबईतील एक स्थळ आणून तिचे लग्न पक्के केले. ही गोष्ट यशवंतला कळताच त्याच्या पायाखालील वाळू सरकली. रेहनाच्या प्रेमात दिवाना झालेला यशवंतला हे लग्न होऊ दयायचे नव्हते. ती फक्त माझी आणि माझीच आहे,असा त्याचा गैरसमज झाला. परंतु तिच्या आई-वडिलांनी रेहानाचे लग्न ठरवल्याने यशवंतचे पित्त खवळले.त्याने तिच्या आईवडिलांना धडा शिकवण्याचा निर्णय घेतला. अखेर दिनांक १२ आगस्ट २००१ रोजी रेहनाची आई जहराबी अब्दुल रेहमान (वय ४८) आणि वडील अब्दुल रेहमान (वय ५३) हे आपल्या मुलींसह कांदीवली(पूर्व) क्रांतीनगर येथील हनुमान चाळीतील गुडलक हॉटेल मध्ये झोपले असता,प्रियकर यशवंत बाबुराव शिंदे याने आपले साथीदार मोहिद्दीन चांदपाशा शेख, नागनाथ मोहनराव तेलंगे व व्यंकट बाबुराव पाचावाड यांच्याशी संगनमत करून रेहना हिचे आई व वडील झोपेत असताना हॉटेलला आग लावुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. या आगीत दोघेही पतिपत्नी भाजल्याने त्यांना तातडीने भगवती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.या प्रकरणी रेहानाची आई जहराबी अब्दुल रेहमान यांनी दिलेल्या तक्रारीवरून कुरार पोलीस ठाण्यास गु.र.क. १३८/२००१ कलम ३०७, ४३६, ४३८, ४४० भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु गुन्हयात फिर्यादी महिला व त्यांचे पती हे भगवती रुग्णालयात उपचार घेत असताना दोघांचा मृत्यू झाल्याने या गुन्हयात भादवि कलम ३०२ वाढवण्यात आले. कुरार पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास केला असता, यशवंत शिंदे यांचे फिर्यादी जहराबी अब्दुल रेहमान यांच्या मुलीशी प्रेम संबंध असताना तीचा विवाह दुसऱ्या मुलाशी ठरविल्याच्या कारणावरून आरोपीने गुन्हा केल्याचे तपासात समोर आले. पोलिसांनी या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन मोहिद्दीन चांदपाशा शेख, नागनाथ मोहनराव तेलंगे, व्यंकट बाबुराव पाचावाड यांना अटक करण्यात आली होती. परंतु गुन्हयातील मुख्य आरोपीत यशवंत बाबुराव शिंदे हा पळून गेलेला होता. पाहिजे आरोपीताचा पोलीस ठाणे कडुन तसेच गुन्हे शाखे कडुन सातत्याने शोध सुरू होता. गुन्हे शाखेच्या कक्ष १२ च्या अधिकाऱ्यांना माहिती प्राप्त झाली की, सदर गुन्हयातील पाहिजे मुख्य आरोपी हा सद्या कोंडवा खूर्द, पुणे येथे स्वतः ची ओळख लपवून व वेशांतर करून राहत आहे. तसेच त्याने सदर कालावधीमध्ये स्वतःचे लग्न केले परंतु त्यावेळी त्याने कोणत्याही नातेवाईकांना लग्नासाठी बोलावले नव्हते. तसेच तो घटनेनंतर कधीही त्याचे लातुर येथील मुळ गावी गेला नव्हता, अशी माहिती प्राप्त झाली होती. अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलीस पथकाने कोंडवा, खूर्द पुणे या परिसरात सलग २४ तास शोध घेवुन आरोपी यशवंत शिंदे यास तब्बल २२ वर्षानंतर २४ नोव्हेंबर २०२३ रोजी अटक करण्यात आली. ही यशस्वी कामगिरी पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (गुन्हे) लखमी गौतम,अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शशिकुमार मिना, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) राज तिलक रौशन, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्र-उत्तर) काशिनाथ चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक सुधिर दळवी, पोनि नवनाथ जगताप, पोनि दिलीप तेजनकर, सपोनि विजय रासकर, सपोनि सावंत, पोउनि खानविलकर, पोह कल्पेश सावंत, बाळकृष्ण लिम्हण, सुनिल चव्हाण, संतोष राणे, संतोष बने, अमोल राणे, विशाल गोमे, प्रसाद गोरुले, पोशि चंद्रकांत शिरसाठ यांनी पार पाडलेली आहे.

## दारुडा बाप डोकेदुखी ठरला...

सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने शिंगणापूर भवानी घाट मौजे पिंपरी नातेपुते तालुका माळशिरस येथील खुनाचा अवघ्या बारा तासाच्या आत उलगडा केला. १५ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ०७.४५ वाजण्याच्या पूर्वी अनोळखी इसमाचा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून, कोणत्यातरी अज्ञात हत्याराने डोक्यात, तोंडावर जबर मारहाण करून जिवे ठार मारून त्यांची मोटार सायकल शिंगणापूर नातेपुते जाणाऱ्या रोडवर भवानी घाट, पिंपरी येथे घाटाचे तिसरे वळण संपल्यानंतर रोडच्या खाली पाच फूट अंतरावर टाकून खून केला अशी माहिती मिळाली होती. सदर खूनाच्या गुन्हयाचे गांभीर्य ओळखून सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी तात्काळ गुन्हयाच्या ठिकाणी भेट देण्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जून भोसले, पंढरपूर उपविभाग, अतिरिक्त चार्ज अकलुज उपविभाग, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर व त्यांचे पथकास योग्य त्या मार्गदर्शनपर सूचना दिल्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर व सपोनि नागनाथ खूणे व त्यांचे पथक घटनास्टळी भेट देवून माहिती घेतली. दरम्यान सदर गुन्हयातील अनोळखी व्यक्ती ही मौजे कोंडबावी ता. माळशिरस जि. सोलापूर या गांवातील असल्याची माहिती मिळाली. मयताचा मुलगा सुरज सावंत याने प्रेत ओळखून माझे वडील पांडूरंग चंद्रकांत सावंत याचेच प्रेत असल्याचे सांगितले. तेंव्हा मयताचा मुलगा सुरज पांडूरंग सावंत (वय २४ वर्षे, रा.कोंडबावी, ता.माळशिरस,जि.सोलापूर) यांनी अज्ञात व्यक्ती विरूध्द फिर्याद दिल्याने नातेपुते पोलीस ठाणे गुरनं ३६९/२०२३ भादविसंक ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील मयत हा कोंडबावी ता. माळशिरस या गांवचा रहिवाशी असल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांनी सपोनि नागनाथ खुणे व त्यांचे पथकास मयताचे राहते गांवी जावून मयताबाबत माहिती काढण्याबाबत मार्गदर्शनपर सुचना देवून रवाना केले होते. त्यानुसार सपोनि नागनाथ खुणे व त्यांचे पथक सदर गांवी जावून माहिती घेत असताना त्यांना गोपनीयरित्या माहिती मिळाली की, यातील मयत हा दारूच्या पूर्णपणे आहारी गेला होता. मागील अनेक वर्षापासून दारूच्या नशेत घरातील लोकांना शिवीगाळ करून त्रास करत होता. त्या त्रासास कंटाळून सदरचा गुन्हा हा यातील फिर्यादी (मयताचा मुलगा) यानेच केला असल्याबाबत खात्रीशीर बातमी मिळाली. त्यानंतर सपोनि नागनाथ खुणे व त्यांचे पथक मयताचे अंतविधीकार्य पूर्ण झाल्यानंतर यातील फिर्यादी (मयताचा मुलगा) यास कोंडबावी येथील राहते घरातून चैकशीकरीता ताब्यात घेतले. त्याचेकडे सदर गुन्हयाचे अनुषंगाने प्रश्नावली करता तो विसंगत असे उत्तरे देवू लागला, त्याचेकडे कौशल्यपूर्ण विचारपूस करता त्याने सांगितले की, मयत वडील हे मागील अनेक वर्षापासून घरातील लोकांना दारू पिऊन सारखे सर्वांना शिवीगाळ व त्रास देत असल्याने त्यांचे त्रासास कंटाळून वडील घरी आल्यानंतर त्यांना एका खोलीमध्ये कोंडून लोखंडी गजाने तोंडावर, डोक्यावर, ठिकठिकाणी मारहाण करून जिवे ठार मारले असल्याचे सांगून प्रेत एका मोठया पिशवीमध्ये भरून प्रेत पिकअप वाहनात टाकून मयताची मोटार सायकल बहिणीने चालवत नेवून नातेपुते येथील शिंगणापूर भवानी घाटात पुरावा नष्ट करण्याच्या उद्देषाने काठाडात टाकून गुन्हा केला असल्याबाबत कबुली दिल्यावरून यातील फिर्यादीस (मयताचा मुलगा) यास नातेपुते पोलीस ठाणेच्या ताब्यात देवून त्यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि प्रविण सपांगे, नातेपुते पोलीस ठाणे हे करीत आहे. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जून भोसले, पंढरपूर उपविभाग, अतिरिक्त चार्ज अकलुज यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक नागनाथ खुणे, सफौ.ख्वाजा मुजावर, नारायण गोलेकर, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड यांनी बजावली आहे.

## दारूची नशा त्यांच्या डोक्यात...

असल्याने दारू पित असेल म्हणून त्याच्या घरच्या लोकांनी त्याच्या दारू पिण्याच्या व्यसनाकडे दुर्लक्ष केले होते. तो सकाळी लवकर मार्केटला गेला की, रात्री उशिराच घराकडे परतत होता. त्यामुळे त्याच्या येण्या जाण्याकडे त्याच्या घरचे लोक दुर्लक्ष करीत होते. भुईजमध्ये ज्यावेळी त्याला काम असेल त्यावेळी तो काम आटोपून लवकर घराकडे येत होता. त्याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने मित्रांच्या बरोबर त्याला दारू प्यायला आवडत होते. दिवाळीचा सण नुकताच संपला असल्याने मार्केटमध्ये अजून तशी कामाला सुरूवात झाली नव्हती.त्यामुळे तो दिवाळीनंतर तसा घरात रिकामाच होता. दिवाळीच्या सणाच्या निमित्याने त्याच्याकडे पैसे आल्याने तो दारू पित चैनी करीत होता. शुक्रवार दि.२४ नोव्हेंबर रोजी त्याच्या मोबाईलवर त्याचा एका मित्राचा फोन आला. त्यावेळी तो शर्ट काढून घरात टिव्ही पाहत होता. मित्राचा फोन त्याने रिसीव्ह करीत त्याला आलो आलो म्हणत तो शर्ट घालून घराबाहेर पडला. त्या रात्री तो उशिरा पर्यत घराकडे आला नाही. त्याच्या घरच्या लोकांनी त्याची वाट पाहून ते तसेच झोपी गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळ सकाळी गावातील पाण्याच्या टाकीजवळ एका तरूणाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याची बातमी भुईज गावात पसरली. जो तो पळत पाण्याच्या टाकीच्या दिशेने जात होता. मयत तरूण मातंग वस्तीतील हमालीचे काम करणारा अनिल कुचेकर हा आहे हे घटनास्थळावरील लोकांनी ओळखले होते. त्यातील एकाने ही माहिती मातंग वस्तीत जाऊन अनिल कुचेकर याचा भाऊ युवराज कुचेकर याला सांगितली. त्याने व त्याच्या घरच्या लोकांनी लागलीच पळत जाऊन घटनास्थळी पाहिले. तो आपला भाऊ अनिल कुचेकर हा असल्याचे त्याने ओळखले त्याने या घटनेची माहिती भुईज पोलीसांना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळावर पालथ्या अवस्थेत अनिल कुचेकर याचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. बाजुलाच एक चप्पल दारूच्या रिकाम्या तीन बाटल्या, ग्लास, विस्कटलले स्नॅक्स पडले होते. या एकंदरीत गोष्टीवरून ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याचा अंदाज पोलीसांनी बांधला. पोलिसांनी घटनास्थळाचा आणि घटनेचा पंचनामा करून मृतदेह भुईज येथील ग्रमीण रूग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत अनिल कुचेकर याचा भाऊ युवराज कुचेकर याच्याकडून घेतली.त्याने दिलेल्या माहिती वरून पोलीसांनी मयत अनिल कुचेकर याचे मोबाईल कॉल रेकॉर्ड तपासले असता त्याच्या मोबाईलवर त्याचा मित्र रोहित राजू बडवे याचा फोन आल्याचे दिसत होते. त्याचबरोबर अनिल कुचेकर याला गावातील लोकांनी रोहित बडवे आणि अशिष शिंदे याच्या बरोबर आदल्या दिवशी पाहिले होते. याची माहिती मिळताच पोलीसांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली.रोहित बडवे आणि अशिष शिंदे याचे मोबाईल ही बंद येत होते त्यामुळे त्याचे लोकेशन पोलीसांना मिळत नव्हते.या घटनेचा तपास वाई स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीस आणि भुईज पोलीस करीत होते. संशयीत आरोपीच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषणचे एक पथक कार्यरत होते. घटनेनंतर संशयीत आरोपी हे पुण्याच्या दिशेने गेल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. त्यातच शनिवार दि.२५ रोजी संशयीत रोहित बडवे आणि अशिष शिंदे हे दोघे आपल्याकडील पैसे संपल्याने आपल्या नातेवाईकांना तसेच मित्रांना आपल्या मोबाईलवरील अकांऊटवर पैसे पाठविण्यासाठी मोबाईलवरून सांगत होते. त्यावेळी त्याच्याकडे गाडीत पेट्रोल टाकण्यासाठी ही पैसे नव्हते. त्यासाठी ते पुण्याबाहेरील हायवेवरील पेट्रोल पंपाजवळून त्यांनी आपल्या नातेवाईकांना आणि मित्रांना फोन केल्याचे स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पोलीसांच्या लक्षात आले. त्याचे मोबाईल लोकेशन मिळताच पोलिसांनी तातडीने हालचाल करून या दोघांना पुण्याबाहेरील हायवेवरील पेट्रोल पंपाजवळून ताब्यात घेऊन त्यांना भुईज पोलीस स्टेशनला आणले. त्याच्याकडे अनिल कुचेकर याच्या खूनाविषयी चौकशी करीत असताना सुरूवातीला त्यांनी पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतु पोलीसांनी त्या दोघांना आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी आपला गुन्हा कबुल करून संपूर्ण हकीकत सांगितली. घटनेच्या दिवशी अनिल कुचेकर रोहित बडवे. अशिष शिंदे आणि एक अल्पवयीन भुईज येथील माळरानावरील पाण्याच्या टाकीजवळ दारू पित बसले होते. या चौघांना ही दारूची नशा चढली. त्यातच अशिष शिंदे याने अनिल कुचेकर याला बोलण्यातून डिवचले त्यावेळी रोहितने त्याला साथ दिली. याचा राग अनिल याला आला. ते चौघे ही दारूच्या नशेत असल्याने कोण काय बोलतो आणि काय म्हणतो याकडे या चौघाचे ही लक्ष नव्हते. सगळ्यांनाच दारू चढली असल्याने अनिलने दारूच्या नशेत रोहित बडवे याला आईवरून शिवी दिली. त्यावेळी रागाच्या भरात असणाऱ्या रोहितने अनिलच्या अंगावर जात त्याला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण करायला सुरूवात केली. यावेळी दारूच्या बाटल्या, ग्लास आणि स्नॅकस सगळे काही विस्कटले गेले. रोहित हा अनिलला मारत असताना अशिष याने बाजुच्या शेतातील ऊसाची मोळी आणली. त्या मोळीने त्या दोघांनी त्याला मारहाण करीत शिव्या दयायला सुरूवात केली. अनिल हा मला मारू नका मला सोडा माझे चुकले असे म्हणत होता.परंतु दारूच्या नशेत असणाऱ्या त्या दोघांनी त्याला मारहाण करणे चालूच ठेवले. या सगळ्या गडबडीत तो अल्पवयीन मुलगा घाबरून निघून गेला. त्याचवेळी तेथे एक प्लास्टिकची पाईप पडल्याचे रोहितने बघितले त्याने ती पाईप घेतली आणि अनिलच्या अंगावर सपासप मारले. याच दरम्यान कुठून तरी एक काठी अशिष याने आणले आणि त्या काठीने अनिलच्या डोक्यात जबर मारहाण केली. या मारहाणीत अनिल कुचेकर हा जागीच बेशुध्द पडला. तो बेशुध्द पडल्याचे बघून त्या दोघांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत तेथून आपल्या मोटार सायकलीवरून धूम ठोकली. अनिल कुचेकर हा बेशुध्द पडला होता. त्याला वेळीच उपचार मिळणे गरजचे होते. परंतु रात्रभर तो तेथेच पडून असल्याने काही वेळातच त्याचा जागी मृत्यू झाला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या पाण्याच्या टाकीजवळील मैदानात काही जण फिरायला आले असता त्यांना तेथे अनिल कुचेकर याचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याचे दिसले.त्यानंतर एकाने या घटनेची माहिती मयत अनिल याच्या भावाला सांगितल्यावर तो तेथे आला. त्याने या घटनेची माहिती भुईज पोलीसांना दिली. या दोघांनी आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत अनिल कुचेकर याचा भाऊ युवराज कुचेकर याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार अनिल नामदेव कुचेकर (वय ३५) याच्या खून प्रकरणी रोहित राजु बडवे (वय २८) रा.भुईज आणि अशिष मानसिंग शिंदे (वय २५) रा.चिधंवली भुईज याच्या विरोधात भा.दं.वी कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना वाई येथील कोर्टात पोलिसांनी हजर केले असता मा.कोर्टाने त्यांना १ डिसेंबर पर्यतची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल, प्लास्टिक पाईप आणि दगड जप्त केला. या घटनेचा तपास वाईचे उपविभागीय अधिकारी बाळासाहेब भालचिम, डीबीपथकाचे प्रभारी अधिकारी सतोंष तासगावकर, तपासी अधिकारी विशाल भंडारे याच्या मार्गदर्शनाखाली सतोंष जाधव. अप्पा कोलवडकर, वैभव टकले, चंद्रकांत भोसले,भरत जाधव यांनी केला. दारूची नशा करी जीवनाची दुर्दशा असे म्हटले जाते.परंतु नशे की बात खिसे म्हणत अनेकजण दारू पिल्यावर भरकटत जातात.त्यातून कुणी कुणाला शिवी दिली तर ती शिवी एखाद्याच्या जिव्हारी लागते आणि त्यातूनच एखाद्याची खूनाची घटना घडते हेच या घटनेवरून पाहयला मिळते.

## प्रेयसीकडून विश्वासघात झाला...

स्पॉटवर नेऊन त्याचा गेम केला. या प्रकरणी तिच्यासह तिचा दुसरा प्रियकर व त्याच्या साथीदाराला पोलिसांनी अटक केली आहे. दुसऱ्या प्रियकरासोबत हत्येचा कट रचून प्रेयसीनेच पहिल्या प्रियकराचा घात केला. तिघांनी मिळून नयनचा गळा आवळून त्याची हत्या केली. एवढेच नाही तर हत्येनंतर रात्री हे दोघेही तरुण मद्यधुंद अवस्थेत नयनच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी घटनास्थळी आले. त्रिशंकू प्रेम प्रकरणातूनच नयनची हत्या झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून या हत्या प्रकरणात १९ वर्षीय प्रेयसीसह दोन तरुणांना पोलिसांनी अटक केली आहे. नयन मुकेश खोडपे, वय १९ वर्ष रा. पांढराबोडी याचा मृतदेह ३० नोव्हेंबर रोजी सकाळी नाल्यात सापडल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. नातेवाईकांच्या सांगण्यावरून काही संशयित तरुणांना ताब्यात घेण्यात आले. संशयितांची कसून चौकशी केली असता त्यांनी हत्या केल्याचे कबूल केले. या हत्या प्रकरणात मुख्य आरोपी मंथन अशोक ठाकरे, वय १९ वर्ष रा.भोजपुर, मित्र साहिल शरद धांडे, वय १९ रा.ठाणा पेट्रोल पंप व प्रेयसी वय १९ रा. बीड सितेपार या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. प्रेयसी आणि माझ्यामध्ये येऊ नकोस असे धमकावत पंधरा दिवसांपूर्वी मंथनने मृतक नयनसोबत पांढराबोडी गावालगत भांडण केले होते. त्यानंतर २७ नोव्हेंबरपासून नयन बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या कुटुंबीयांनी केली होती. दिनांक २७ नोव्हेंबरला प्रेयसीने नयनला फोन करून भंडारा येथे बोलावून घेतले. तेथून नयन मोटासायकलने प्रेयसीला नांदोरा झीरी या पर्यटनस्थळी घेऊन गेला. दोघेही गप्पा गोष्टी करीत असताना दुपारी मंथन व साहिल एका मोटासायकलने तेथे आले. मंथनने नयनसोबत भांडण करून जबर मारहाण केली. एवढ्यावर ते थांबले नाही तर एका दुप्पट्ट्याने नयनचा गळा आवळून झाडाला बांधून त्याला मारहाण केली. नयनचा मृतदेह तसाच सोडून ते तिघेही ट्रीपल सीट भंडाऱ्याला आले. हत्येच्या रात्री आरोपी मंथन आणि साहिल दोघेही मित्र मद्यधुंद अवस्थेत पुन्हा नांदोरा झीरी येथे आले. झाडाखाली पडून असलेल्या नयनचा मृतदेह उचलून पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने पंडित नाल्यातील लहान पुलावरून गोसे धरणाच्या बॅक वॉटरच्या पाण्यात फेकून दिला. त्यानंतर दोघांनी नयनची मोटासायकल भंडारा तहसील कार्यालयाजवळील मोडक्या इमारतीजवळ फेकून दिली. मृतक नयनच्या नातेवाईकांनी सुरुवातीलाच मंथनवर संशय व्यक्त केला. त्या दिशेने तपास करीत पोलिसांनी मंथनला ताब्यात घेतले. नयनची हत्या केल्यानंतर दुसरा आरोपी साहील शरद धांडे हा सायंकाळी नशा करून ठाणा पेट्रोल पंप येथील पान टपरीवर आला. बेधुंद नशेत तो जोर जोराने ओरडून मैने अभी अभी एक जण को टपकाया है असे सांगू लागला. मात्र उपस्थितांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. दुसऱ्या दिवशी नयनच्या खून प्रकरणाच्या बातम्या झळकल्या त्यानंतर साहिलच्या हत्येबाबत बोलल्याच्या चर्चा ठाणा पेट्रोल पंप येथे रंगल्या. दरम्यान पोलिसांनी साहिलला सकाळीच त्यांच्या घरून अटक केली. व युवती आरोपीस बीड सीतेपार येथून अटक करून गुन्हा ३०५/२३ कलम ३०२,२०१ दाखल करून पुढील तपासासाठी अटक केली. पुढील तपास ठाणेदार सुधिर बोरकुटे करीत आहे.

## भाईंदर येथे आईच्या वाढदिवसाला निघालेल्या चिमुकल्याचा अपघाती मृत्यू

मिरा-भाईंदर : पत्नीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी दुचाकीवरून निघालेल्या कुटुंबियाच्या दुचाकीचा अपघात झाला. या दुर्घटनेत आईच्या मांडीवर असेलल्या ११ महिन्यांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला. भाईंदर येथे शनिवारी दुपारी ही दुर्घटना घडली. दक्ष शहा असे या अपघातात मरण पावलेल्या चिमुकल्याचे नाव आहे. कुणाल शहा हे पत्नी जिग्ना आणि कियरा (५) तसेच दक्ष (११ महिने) या दोन मुलांसह बाबुदा रेसिडेन्सी येथे राहतात. शनिवारी त्यांची पत्नी जिग्ना हिचा वाढदिवस होता. भाईंदर पश्चिमेच्या गोराई समुद्रकिनाऱ्यावरील रिसॉर्टमध्ये सहकुटुंब वाढदिवस साजरा करण्याचे त्यांनी ठरवले. भाईंदरवरून गोराई जवळच असल्याने त्यांनी दुचाकीवरून जाण्याचे ठरवले. त्यानुसार संध्याकाळी ४.०० वाजता कुणाल शहा यांच्या ॲक्टीव्हा या दुचाकीवरून चौघे निघाले. कुणाल शहा ॲक्टीव्हा चालवत होते. ५ वर्षांची कियरा पुढे होती तर ११ महिन्यांचा दक्ष मागे बसलेल्या आईच्या मांडीवर होता. ते उत्तन रोड येथील सुरभी हॉटेल जवळून जात असताना रस्त्यावरील साचलेल्या पाण्यामुळे त्यांची दुचाकी घसरली. यामुळे आईच्या हातून दक्ष खाली फेकला गेला आणि त्याच्या डोक्याला जबर दुखापत झाली. डोक्याला मार लागल्याने चिमुकल्या दक्षचा मृत्यू झाला. याप्रकरणी भांईदर पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पाण्यात जाणारी दुचाकी घसरल्याने हा अपघात झाला. शहा दांपत्य आणि त्यांची मुलगी जखमी झाले तर मुलाचा मृत्यू झाला अशी माहिती भाईंदर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुर्यकात नाईकवाडे यांनी दिली.

पान ८ वरून....

## 'विकसित भारत संकल्प यात्रेचा' भव्य ...

उपायुक्त नयना ससाणे, उपायुक्त तानाजी नरळे, उपायुक्त संघमित्रा खिल्लारे, उपायुक्त विनोद डवले, वसईचे प्रांताधिकारी शेखर घाडगे, तहसीलदार अविनाश कोष्टी, सहाय्यक आयुक्त मोहन संख्ये, सहाय्यक आयुक्त विश्वनाथ तळेकर, तसेच भाजपाचे नालासोपारा विधानसभा संघटन राजन नाईक, भाजपाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, भाजपाचे वसई विधानसभा संघटक मनोज पाटील, राजेंद्र म्हात्रे, अभय कक्कड, मनोज बारोट यासह विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, पत्रकार, पालिकेचे अधिकारी व कर्मचारी, नागरिक उपस्थित होते, सिनेअभिनेते अरुण कदम खास या यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित होते. शासनाच्या योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन यावेळी अभिनेता कदम यांनी केले. प्रास्ताविक उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी केले तर सुत्रसंचालन प्रभारी सहाय्यक आयुक्त विश्वनाथ तळेकर यांनी केले.

### शिबिरांना पहिल्याच दिवशी मोठा प्रतिसाद

या यात्रेदरम्यान वसई विरार शहरात एकूण ५ शिबिरे भरविण्यात आली होती. त्यावेळी आरोग्य शिबिरात ६७ जणांनी लाभ घेता. ६६ जणांना आयुष्यमान भारत कार्डाचे वाटप करण्यात आले. याशिवाय पंतप्रधान स्वनिधी योजनेअंतर्गत २१ जणांना, पंतप्रधान उज्वला योजनेअंतर्गत ९ जणांना लाभ देण्यात आला. याशिवाय आधार दुरूस्ती शिबिरात ८ जणांच्या आधार कार्डाची दुरूस्ती करण्यात आली.

## पालघर येथील शासकीय आश्रमशाळेतील...

दि.२९/११/२०२३ ते दि.२/१२/२०२३ या दरम्यान रवाना होणार असुन त्याठीकाणी भेट देवुन त्या ठीकाणाची माहिती घेणार आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना बाहेरील जगाची ओळख व्हावी. त्यांच्या ज्ञानात भर पडावी, विद्यार्थ्यांना विज्ञानाविषयी व नवीन तंत्रज्ञानाविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी. भविष्यात आश्रमशाळेतुन सुध्दा वैज्ञानिक तयार व्हावेत या उदात्त हेतुने नाविन्यपुर्णयोजना आश्रमशाळेतील विद्यार्थ्यासाठी मंजुर करुन घेण्यात आलेली आहे. विद्यार्थी पहिल्यांदाच रेल्वेने प्रवास करीत असल्याने त्याचा आनंद विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर दिसत होता.

## पालघर येथे सर्व संघटनांच्यावतीने संविधान...

(शिवसेना शिंदेगट) सौ ज्योती राऊत पालघर शहर उपसंघटक (शिवसेना शिंदे गट) राममनी त्रिपाठी( सुंदरम शाळा ट्रस्टी) विकी संखे, प्रतीक यादव (शिवसेना शिंदे गट) रिपाई (आ)चे सुरेश जाधव (जिल्हाध्यक्ष पालघर), सचिन लोखंडे (कार्याध्यक्ष पालघर जिल्हा), नवीन भाई त्रिपाठी (उपाध्यक्ष पालघर जिल्हा) रोहिणी गायकवाड (महिला अध्यक्ष पालघर जिल्हा) संध्याताई राऊत (महिला कार्याध्यक्ष पालघर जिल्हा) कुंदन मोरे (उपाध्यक्ष पालघर जिल्हा) विजेंद्र ठाकूर (युवा कार्याध्यक्ष पालघर जिल्हा) शरद जाधव (युवा अध्यक्ष पालघर तालुका) आयु राम ठाकूर (युवा उपाध्यक्ष पालघर तालुका) अहमद भिमानी (पा.ता अध्यक्ष) वर्षा काटेला, तृप्ती मोरे (महिला अध्यक्ष पा.ता.) महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब गुंड, जनरल सेक्रेटरी के.व्ही. नारायणन, राष्ट्रीय बंजारा टायगरचे महाराष्ट्र समन्वयक रवि राठोड, ॲड.निखिल राऊत, सुप्रिया जाधव, सुरेखा गायकवाड, अंकिता जाधव, महेश गायकवाड, महेंद्र जाधव, पवन ठाकूर, राजू शेख, बाबू शेख व शेकडोच्या वर कार्यकर्ते कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी आलेल्या कार्यकर्त्यांसाठी कार्यकर्त्यांसाठी चहापाणी व नाश्त्याची व्यवस्था आयोजकांच्या वतीने करण्यात आली होती. सदर कार्यक्रम संपन्न करण्यासाठी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

## वाडा तालुक्यातील शेतकरी, कामगार...

बदलून त्या ठिकाणी नवीन खांब व तारा बसवाव्या तसेच गावपाड्यांसाठी आवश्यक त्या ठिकाणी नवीन पोल टाकून वीज पुरवठा करावा. द्रुतगती महामार्गामध्ये तालुक्यातील गोराड, निंबवली, केळठण व इतर गावामधील जमीन बाधीत मालकांना त्वरीत योग्य मोबदला मिळावा, वाडा तालुक्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात गावांमध्ये वाढीव गावठाण क्षेत्र उपलब्ध करून द्यावा, अवकाळी पावसाळामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची त्वरीत पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, तसेच तालुक्यातील शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत बी-बियाणे, खतांचा पुरवठा करावा, भिवंडी वाडा मनोर राज्य महामार्गाचे निकृष्ठ काम व सदर रस्त्यावर आजपर्यंत मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप लोकांच्या मृत्यूस कारणीभूत ठेकेदार, एजन्सीवर व संबंधित सा.बां. विभागाचे अधिकारी वर्गावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून संबंधित ठेकेदार, एजन्सीला काळ्या यादीत टाकून त्वरीत कायदेशीर कारवाई करावी व सदर रस्त्यावर झालेल्या करोडो रूपयांच्या खर्चाची चौकशी करून केलेल्या देयकामधूनच उर्वरित सर्व काम त्याच ठेकेदारांकडून त्वरीत पुर्ण करून घ्यावी अशा व इतर मागण्यांसह शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा केली व आपल्या मागण्या शासन दरबारी सदर केल्या.

क्राईम संध्या | सोमवार दि. ०४ डिसेंबर २०२३ ते रविवार दि. १० डिसेंबर २०२३ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ७

# वसईत भारतीय संविधान गौरव दिन उत्साहात साजरा



**वसई/प्रतिनिधी**

भारतीय संविधान अमृत महोत्सव समितीच्या वतीने दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी के.टी. संकुल मैदान, साई नगर, वसई रोड येथे उत्साहात साजरा करण्यात आला. अवकाळी पाऊस असून सुद्धा निष्ठावान संविधान प्रेमींनी आपली उपस्थिती आवर्जून लावली होती. कार्यक्रमाच्या रुपरेषे प्रमाणे सायंकाळी ५:०० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, अंबाडी रोड येथून भारतीय संविधानाच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. विविध रंगाच्या फुलांनी सजवलेल्या ट्रॉलीवर संविधानाची प्रतिकृती ठेवण्यात आली होती. मिरवणूक सुरू होताच विजांचा कडकडाट, तुफान वादळ व पावसाच्या जोरदार सरी सुरू झाल्या, या आस्मानी संकटापुढे न डगमगता मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. विविध धर्मांचे धर्मगुरू हातात संविधानाच्या कलमांची घोषणापत्र व तिरंगे झेंडे घेऊन रॅलीचे नेतृत्त्व करीत होते. रॅली मैदानात पोचताच रॅलीचे सभेत रूपांतर झाले. मौलाना सुभान यांनी या सभेचे अध्यक्षपद स्वीकारले. या सभेचे उदघाटन संत जोसेफ महाविद्यालय, नंदाखलचे प्राचार्य मा. फादर ज्यो आल्मेडा यांनी केले. भन्ते नागसेन महाथेरो, मा. संदेश घोलप, फादर ज्यो आल्मेडा, फारुख मुल्ला यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. त्यानंतर सभेला सुरुवात झाली. या सभेला मा. शशी सोनवणे, मा. मेकन्झि डाबरे, मा. प्रीती शेखर यांनी मार्गदर्शन केले. मा. शशी सोनवणे यांनी विद्यमान केंद्रीय सरकार घटनेची पायमल्ली कशी करीत आहे हे समर्पक उदाहरणांसह स्पष्ट केले. असंघटित कामगार नेते मा. मॅकेन्झि डाबरे यांनी विद्यमान सरकार घटना डावलून कामगारांचे हक्क हिरावून घेत असल्याचे व कामगारांचे शोषण करीत असल्याचे सांगितले. महिला जनमंचच्या नेत्या मा. प्रीती शेखर यांनी सरकारच्या घटनाविरोधी धोरणावर जोरदार हल्ला केला. मा. प्राध्यापिका शोभाताई बागुल यांनी ॲड असीम सरोदे यांचा संदेश वाचून दाखविला. याशिवाय, मा. ॲड फारुख मुल्ला, मा. ॲड ईश्वर धुळे इत्यादी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. भन्ते नागसेन महाथेरो यांनी या कार्यक्रमाला मंगल कामना दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. मौलाना सुभान यांनी आपल्या ओघवत्या वाणीने उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या देशात जंगलराज असून गरीब, शोषित व अल्पसंख्यांकांसाठी ना पोलिस आहे, ना कोर्ट आहे, ना सरकार आहे; अशी खंत त्यांनी व्यक्त केली. या देशात धर्म खतरे में नहीं – इन्सानियत खतरे में हैं याची जाणीव उपस्थितांना करून दिली. सादर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. दिनेश जाधव व प्रास्ताविक मा. प्रा. डॉ सुरेश गोतपागर यांनी केले. प्रस्ताविकेत त्यांनी सदर संविधान दिनाच्या कार्यक्रमाच्या आयोजनाचे महत्व स्पष्ट केले. तसेच भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध नियोजित उपक्रमांची माहिती दिली. शेवटी संविधान अमृत महोत्सव समितीचे कार्याध्यक्ष मा. दत्तात्रेय धुळे यांनी उपस्थितांचे व विविध संघटनांचे आभार मानले. सादर कार्यक्रमाच्या आयोजनात विविध जाती धर्माच्या जवळपास तीस संघटनांनी सहभाग घेतला होता. तसेच भारतीय संविधान अमृत महोत्सव समितीचे कोषाध्यक्ष मा. प्रकाश कांबळे, समन्वयक मा. कर्नल सिद्धार्थ बर्वे, मा. समीर वर्तक यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# चोरी, घरपोडीचे २६ गुन्हे दाखल असलेला सराईत चोरटा जेरबंद




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहर परिसरात चोरी, घरपोडी करणारा गुन्हेगारला सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून १ लाख ९७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. राजू और गुंड्या मधुकर पवार (वय २५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. हा गुन्हेगार असून यांनी चोरी घरपोडी केलेल्या मुद्देमालातील सोन्या-चांदी दागिन्याचे विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती सोलापूर शहर गुन्हे शाखेतील पोलिसांना मिळाले. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावला असता जुना कारंबा नाका येथे त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने त्याच्या एका साथीदारासह चोरी घरपोडी केल्याचे कबूल केले तसेच त्याच्याकडून सात गुन्हे उघडकीस करून त्यातील ५८ ग्रॅम सोन्याचे दागिने व ३२५ ग्रॅम चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ९७ हजार रुपये पाचशे रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तर त्याने सोलापूर आणि पुणे शहरात आणखी ११ गुन्हे केले असून त्या गुन्ह्यात तो फरार होता, असे हे ओळखीचे आले आहे. ही सदरची कामगिरी सोलापूर शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, उपायुक्त दिपाली काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, अंमलदार विजय वाळके, विद्यासागर मोहिते तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, सुभाष मुंडे, शैलेश उघड, वशिम शेख, चालक ठोकळ यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे.

# वाड्यातील दुकानांच्या पाट्या बदलण्याची घाई




**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने दुकाने व आस्थापानांच्या पाट्या देवनागरी लिपितील मराठी भाषेत लावणचे आदेश लागू केले. असताना वाडा नगर पंचायतीच्या वतीने प्रत्येक दुकानदारांना लेखी नोटीस बजावण्यात आली आहे. दुकाने व आस्थापनांच्या नामफलकात मराठी नाव प्रथम दर्शनी व ठळक अक्षरात व इतर भाषेतील अक्षरे लहान असावीत, ज्या आस्थापनांमध्ये मद्य पुरविले जाते किंवा विक्री केले जाते अशा दुकानांच्या नामफलकात महान व्यक्ती व गड किल्ल्यांचा उल्लेख नसावा असे नोटीसीत नमूद केले आहे. या नोटीसींच्या अनुषंगाने दुकानदारांकडून इंग्रजी भाषेतील पाट्या काढून मराठी भाषेतील पाट्या लावण्याची लगबग सुरु झाली होती. वाडा शहरातील बहुतेक दुकानदारांनी पहिल्याच दिवशी मराठी पाट्या लावल्याचे दिसून आले. तर काही दुकाने व कंपन्यांच्या पाट्या इंग्रजी मध्ये असल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी अशा फलकांवर काळे फासून निषेध व्यक्त केला. व लवकरात लवकर मराठी पाट्या लावण्याचे आवाहन केले तसे न केल्यास आंदोलनाचा ईशारा दिला आहे.

# ऑटो रिक्षात प्रवासी म्हणून बसून लुटमार करणाऱ्या दोघा चोरट्यांना कोनगाव पोलिसांनी केली अटक

**भिवंडी/प्रतिनिधी**




भिवंडी शहर व परिसरात रिक्षा प्रवासी म्हणून बसून सहप्रवाशांना रस्त्यात अडवून लुटमार करणाऱ्या दोघा जणांच्या मुसक्या आवळण्यात कोनगाव पोलिसांनी यश मिळवले असून त्यांच्या ताब्यातून चोरीची एक कार दोन रिक्षा व सात मोबाईल असा ७ लाख ६३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत पाच गुन्ह्यांची उकल केली आहे, अशी माहिती भिवंडी पूर्व विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. २६ नोव्हेंबर रोजी मानकोली ते राजनोली या दरम्यान रिक्षाने प्रवास करणारे सिंटू मौर्य यास रिक्षा चालकासह त्याच्या दोघा साथीदारांनी रस्त्यात रिक्षा थांबवून चाकूचा धाक दाखवून मारहाण करून लुटमार केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी कोनगाव पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पवार व पोलिस निरीक्षक दीप बने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव चुंबळे, पोलीस हवालदार मधुकर घोडसरे, जगदिश पाटील, पोलीस नाईक नरेंद्र पाटिल, पोलीस शिपाई राहुल वाकसे, हेमराज पाटिल, कुशल जाधव, हेमंत खडसरे, अच्युत गायकवाड, रमाकांत साळुंखे या पथकाने गुप्त बातमीदाराच्या माहितीने पोलिसांनी कल्याण येथून शेखर गोवर्धन पवार, वय २६ वर्ष, रा. नेतीवली चक्की नाका, कल्याण पुर्व व मनीष भोलानाथ गुप्ता, वय २७ वर्ष, रा. उल्हासनगर नं ४ यांना ताब्यात घेत त्यांच्या कडे कसून चौकशी केली असता त्यांनी अशा प्रकारे लुटमारीच्या या व्यतिरिक्त भिवंडी तालुका, रायगड येथील दादर सागरी पोलीस ठाणे, वाशिंद ता. शहापूर व रबाळे पोलिस ठाणे या पोलिस ठाण्यात अशाच प्रकारे लुटमार करून कार व रिक्षा सुध्दा चोरी केली असून या दोघा आरोपींना न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे.या आरोपींचा एक साथीदार फरार असून त्याचा शोध पोलिस घेत असून पकडलेल्या दोघा आरोपींकडे अधिक तपासात अजून काही गुन्हे दाखल होण्याची शक्यता सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार यांनी दिली आहे.

# भादा रोडवरील अतिक्रमणावर हातोडा



**औसा/प्रतिनिधी**

औसा शहरांमध्ये लातूर वेस हनुमान मंदिरापासून बाजार रोडवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्यामुळे सातत्याने वाहतुकीची कोंडी होत होती नागरिकांनी रस्त्याच्या समोरील बाजूस मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्यामुळे रस्ता अरुंद झाला होता. तसेच लहान मोठे अपघात सातत्याने होत होते. सध्या साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू असून ऊस वाहतूक करणारे ट्रक आणि ट्रॅक्टर तसेच प्रवासी बसेस शाळा महाविद्यालयाच्या स्कूल बस टेम्पो जिप व मोटरसायकल चालवणाऱ्या नागरिकांना या रस्त्यावरून जाताना येथे थाटलेल्या अतिक्रमणामुळे अतोनात त्रास सहन करावा लागत होता. दरम्यान नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेता औसा सार्वजनिक बांधकाम विभागाने औसा नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाचे सहकार्य घेऊन १ डिसेंबर २०२४ रोजी अतिक्रमण हटवण्याची मोहीम धुमधडाक्यात राबवीत भादा रोडवर असलेले अतिक्रमांवर बुलडोझर फिरविले. सार्वजनिक बांधकाम विभागाने लातूर वेस्ट हनुमान मंदिरापासून बाजार रोड कडे जाणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमण काढल्यामुळे या रस्त्याने एक डिसेंबर रोजी अखेर मोकळा श्वास घेण्यास सुरुवात केली आहे.

# ३ वर्षांच्या चिमुकल्याचा श्वसन नलिकेत फुगा अडकल्याने मृत्यू

**वाडा/प्रतिनिधी**



तीन वर्षांच्या चिमुकल्याच्या श्वसन नलिकेत फुगा अडकल्याने त्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. वाडा तालुक्यात ही घटना घडली असून हर्ष बुधर असे मृत तीन वर्षांच्या चिमुकल्याचे नाव आहे. चिमुकल्याच्या मृत्यूमुळे कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात भगतपाडा या दुर्गम भागात आपल्या कुटुंबीयांसोबत राहणारा हर्ष बुधर हा तीन वर्षांचा चिमुकला आपल्या मित्रांसोबत अंगणात खेळत होता. मात्र, खेळ खेळत असताना अचानक हर्षची तब्येत बिघडली. चिमुकल्याची तब्येत अचानक बिघडल्याने हर्षचे कुटुंबीय चिंतेत पडले होते. खेळता खेळता हर्षला नेमके काय झाले? तो कुठे पडला का? त्याला काही लागलं का? अशी विचारणा हर्षच्या कुटुंबीयांनी हर्षसोबत खेळत असलेल्या त्याच्या मित्रांकडे केली. यावेळी हर्षने खेळता खेळता फुगा गिळल्याचे त्याच्या मित्रांनी सांगितले. हर्षने फुगा गेल्याचे त्याच्या कुटुंबीयांना कळताच कुटुंबीय भयभीत झाले. त्यांनतर हर्षला उपचारासाठी रुग्णालयात नेत असतानाच रबरचा असलेला हा फुगा हर्षच्या श्वसन नलिकेत अडकल्याने रुग्णालयात त्याला दाखल करण्याआधीच वाटेतच त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी या चिमुकल्याला मृत घोषित केले. तीन वर्षांच्या आपल्या चिमुकल्याचा अशाप्रकारे दुर्दैवी मृत्यू झाल्याने बुधर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. चिमुकल्याच्या मृत्यूने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# लहुजी सेना शिष्टमंडळाने घेतली आमदार अमित देशमुख यांची भेट

लातूर : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची शुक्रवार दि. १ डिसेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लहुजी सेनेच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन विविध मागण्याचे निवेदन दिले, या मागण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला जाईल, असे आश्र्वासन या शिष्टमंडळाला दिले, यासोबतच यावेळी लातूर शहर व जिल्ह्यातील नागरिक तसेच विविध संस्था, संघटनेच्या शिष्टमंडळांची भेट घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले, त्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासंदर्भात संबंधितांना सूचना केल्या आहेत. बाभळगाव निवासस्थानी लहुजी सेना लातूर शिष्टमंडळाने भेट घेऊन अनुसूचित जाती (एस.सी) कॅटेगिरीतून मातंग समाजाला अ, ब, क, ड वर्गवारीनुसार आरक्षण लागू करावे आदी विविध मागण्याबाबत चर्चा करून त्यांना निवेदन दिले. यावेळी लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष अंगद वाघमारे, माजी उपमहापौर कैलास कांबळे, काँग्रेस पक्षाचे प्रभाग क्रमांक तीनचे अध्यक्ष विकास कांबळे, आनंद वैरागे, माया कांबळे, पिराजी साठे, आप्पासाहेब देडे आदीसह लहुजी सेनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# सामाजिक उपक्रमांनी साजरा केला; मित्राच्या लग्नाचा रौप्य महोत्सव




**लातूर/प्रतिनिधी**

पुणे येथे स्थायिक झालेले पण लातूरच्या व्यंकटेश विद्यालयात शालेय शिक्षण घेतलेले सुप्रसिध्द उद्योजक वेदप्रकाश शर्मा यांच्या लग्नाचा रौप्य महोत्सव आज लातूर शहरात त्यांच्या वर्गमित्रांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा केला. व्यंकटेश विद्यालयात १९९० मध्ये १०वी वर्गात शिक्षण घेतलेल्या विदयार्थी आणि विद्यार्थिनी यांनी एकत्र येत भेटी लागे जीवा हा समूह तयार केला आहे. या समूहात तब्बल १८० मित्र मैत्रिणी सहभागी आहेत. आज या समूहातील वेदप्रकाश शर्मा यांच्या विवाहाला २५ वर्ष पूर्ण होत आहेत. या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त भेटी लागे जीवाच्या वतीने शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले तर स्क्रॅप मार्केट परिसरात असलेल्या गोरक्षण येथे जाऊन गोमातेची सेवा करण्यात आली. अनावश्यक खर्च टाळत, पैशांचा अपव्यय न करता भेटी लागे जीवा हा समूह आपल्या मित्रांचे वाढदिवस, लग्न वर्धापनदिन समाजपयोगी, दिशादर्शक उपक्रम राबवून मित्राच्या आनंदात सहभागी होत आहेत.

# जान्हवी कराळे यांना पीएच.डी.पदवी प्रदान

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील वसुरी (बु.) येथील रावाचापाडा येथील जान्हवी जितेंद्र यांना मानवविज्ञान शाखेअंतर्गत मराठी या विषयातील मराठी भाषेतील अनुवादित कथासाहित्यांचा अभ्यास (इ.स.२००० नंतरच्या कथा) या संशोधन प्रबंधासाठी सावित्रीबाई फुले, विद्यापीठ, पुणे Doctor of Philosophy (Ph.D.) विद्यावाचस्पती ही पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांना मिळालेला यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण पी. जे. हायस्कूल येथे झाले. त्यानंतर एम. ए. शिक्षण प्रथम श्रेणीत पास होऊन एल. एल. बी शिक्षण पूर्ण केले. कुटूंब, मुलांचे शिक्षण, प्रपंच सांभाळुन शिक्षणाचा वारसा कायम सुरू ठेवलेला आहे. त्यांचे पती स्वतः प्रोफेशन मध्ये असून अडव्होकेट अँड टॅक्स प्रॅक्टीशनर आहेत. त्यांच्या प्रोफेशनल कामामध्ये देखील त्यांचे मोलाचे सहकार्य आहे. त्यांचे मूळ गाव पालसई हे असून त्यांच्या वडिलांचे नाव कै.डॉ. मधुकर जानु पाटील हे देखील सामाजिक सेवेत तत्पर होते. आई श्रीमती. साधना मधुकर पाटील या पी.जे. हायस्कूल वाडा येथे माध्यमिक शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. मुळात शैक्षणिक वारसा जपणारे हे कुटूंब आहे. त्यांचे सासर हे कराळे परिवार रावाचापाडा येथील आहे. त्यांच्या शैक्षणिक यशामध्ये त्यांचे पती, त्यांचे कुटूंब, सहकारी आणि त्यांचे मार्गदर्शक प्रो. डॉ. किरण नामदेव पिंगळे व के. टी. एच. एम. महाविद्यालय, मराठी विभाग, नाशिक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

# वसई तालुक्यात ज्येष्ठ नागरिकांना फसविण्याचे प्रकार वाढीस

## पत्रके छापून नागरिकांना सावध राहण्याचे आचोळे पोलिसांचे आवाहन

**वसई/प्रतिनिधी**




'पुढे दंगल सुरू आहे', 'पुढे खून झाला आहे', 'सेठला मुलगा झाल्याने तो साडी वाटतोय' असं सांगून ज्येष्ठ नागरिकांना फसविण्याचे प्रकार वाढीस लागले आहे. एकीकडे फसवणुकीचे ऑनलाईन गुन्हे वाढत असले तरी दुसरीकडे फसवणुकीसाठी १९८०-९० च्या दशकातील या जुन्या पध्दती आजही वापरल्या जात आहेत. अशा गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याने पोलिसांनी पत्रके छापून नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. ठकसेन विविध क्लृप्त्या वापरून नागरिकांची फसवणूक करत असतात. रस्त्यातून जाणार्या जेष्ठ नागरिकांना भामटे बोलण्यात गुंतवून हातचलाखीने त्यांच्या अंगावरील दागिन रोख, रक्कम काढून घेत असतात. आम्ही पोलीस आहोत, 'पुढे खून झाला आहे', 'साड्यांचे वाटप चालू आहे अंगावरील सोन्याचे दागिने काढून ठेवा अन्यछथा साडी मिळणार नाही' असे सांगून या नागरिकांची दिशाभूल केली जाते आणि हाचचलाखीने सोन्याचे दागिने बदलून नकली दागिने दिले जातात. १९८०-९० च्या दशकात असे प्रकार सुरू झाले होते. मात्र काळ बदलला तरी अद्यापही असे गुन्हे सुरू आहेत. सध्या ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार होत असतानाही या जुन्या पध्दतीने फसवणुकीच्या घटना घडत आहेत. यासाठी आचोळे पोलिसांनी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी ५ हजार पत्रके छापून वाटली आहेत. कुणी अनोळखी इसम अशा प्रकारे काही सांगत असेल तर त्यावर विश्वास ठेवू नका असे आवाहन या पत्रकातून करण्यात आले आहे. याबाबत माहिती देताना नालासोपारा येथील आचोळे पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी सांगितले की, हे ठकसेन अत्यंत सराईत असतात. ज्येष्ठ नागरिकांनी बोलण्यात गुंतवून त्यांना लुबाडत असतात. आजही अशा प्रकारे फसवणूक सुरू असल्याने आम्ही पत्रके काढून नागरिकांमध्ये जनजागृती करत आहोत. नागरिकांनी अशाप्रकारे भुलथापांना बळी पडू नये असे आवाहनही त्यांनी केले आहे. दरम्यान मंगळवारी विरारमध्ये सुनिता पाटोळे (६३) या महिलेला अशाच प्रकारे रस्त्यात गाठून दोन ठकसेनांनी ५६ हजार रुपयांचे दागिने काढून घेतले आहे, पाटोळे या दुपारी विरार पश्चिमेच्या बस स्थानकाजवळून जात असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांना रस्त्यात गाठले. पुढे सरदार लोकं धान्य वाटत आहेत. तुमच्या गळ्यातील सोन्याचे दागिने पाहिल तर तुम्हाला धान्य मिळणार नाही, असे सांगून त्यांना बोलण्यात गुंतवले आणि त्यांच्या गळ्यातील ५६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हातचलाखीने काढून घेतले. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

# दीपक साळुंखे यांना आदिवासी सेवक पुरस्कार प्रदान




**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देणे व त्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने राज्य शासनामार्फत आदिवासी सेवक पुरस्कार हा राज्य पुरस्कार दरवर्षी प्रदान करुन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येतो. नाशिक येथील महाकवी कालिदास कलामंदिर येथे आयोजित कार्यक्रमात वाडा शहरातील रहिवासी, पत्रकार दीपक साळुंखे यांना त्यांच्या समाज कार्याची दखल घेऊन मान्यवरांच्या हस्ते आदिवशी सेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. गरजु लोकांची निस्वार्थपणे कामे करणे, गोर-गरीब लोकांना न्याय मिळवून देणे, आंदोलन व उपोषणाच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्न सोडविण्याचे काम नेहमीच करत आले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन साळूंखे यांना पुरस्कृत करण्यात आले आहे, २५ हजार रुपयांचा धनादेश, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

04 TO 10 DECEMBER 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 12/2/2023 10:45 PM Page 1



# ‘विकसित भारत संकल्प यात्रेचा’ भव्य शुभारंभ

## खासदार राजेंद्र गावीत यांच्याकडून वसई-विरार महापालिकेच्या नियोजनाचे कौतुक







**वसई/प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या सर्वसामान्य नागरिकांसाठी आणलेल्या विविध योजना अत्यंत कल्याणकारी असून त्यामुळे नागरिकांना मोठा लाभ मिळणार आहे. पालिकेने अत्यंत कमी वेळेत चांगले नियोजन करून या यात्रेची सुरवात केली आहे, असे गौरवोद्गगार खासदार राजेंद्र गावित यांनी केले आहे. केंद्र शासनाच्या विकसित भारत संकल्प यात्रेचा भव्य शुभारंभ बुधवारी नायगाव येथील परेरा नगर मध्ये झाला. यावेळी खासदार राजेंद्र गावित आणि पालिका आयुक्त अनिलकुमार पवार उपस्थित होते.

केंद्र शासनाकडून नागरिकांसाठी विविध योजना राबविल्या जातात. त्यामध्ये प्रधानमंत्री पथविक्रेता, आत्मनिर्भर निधी, प्रधानममंत्री आवास योजना, स्वच्छ भारत अभियान, प्रधानमंत्री ई-बस योजना, अमृत योजना आदी विविध योजनांचा समावेश आहे. या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवून त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी ’विकसित भारत संकल्प यात्रा’ या मोहीमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत शासकीय योजनांची माहिती देणारी व्हॅन जागोजागी फिरणार आहे. २८ नोव्हेंबर ते २२ डिसेंबर २०२३ या कालावधीत एकूण वसई विरार शहरात एकूण ४९ ठिकाणी या यात्रेअतर्गत व्हॅन फिरणार असून शिबिरे आयोजित करून नागरिकांना योजनेची माहिती आणि लाभ मिळवून दिला जाणार आहे. दोन सत्रात सकाळी ९ ते १ व दुपारी ४ ते ८ या वेळेत व्हॅन फिरत्या गाडीतून योजनांची माहिती दिली जाणार आहे. अशी माहिती पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी दिली असून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. केंद्राच्या योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी ही यात्रा महत्वाची ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. या यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी माजी महापौर नारायण मानकर, माजी महापौर प्रवीण शेट्टी, अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे, माजी सभापती कनैया भोईर, उपायुक्त डॉ चारुशिला पंडित, ...पान ६ वर

# पालघर येथील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा इस्त्रो व बेंगलोर येथे अभ्यास दौरा




**पालघर/प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. डहाणू अंतर्गत ३३ शासकीय व २१ अनुदानित आश्रमशाळा असुन त्यामध्ये सुमारे ३१ हजार ८०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या आदिवासी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना इस्त्रोच्या शास्त्रज्ञांची भेट घेण्याची संधी मिळणे हे त्यांच्यासाठी स्वप्नासारखेच आहे . विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन देऊन आदिवासी दुर्गम भागातील विद्यार्थी सुध्दा कुठल्याच क्षेत्रात मागे नसल्याची जाणीव एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी संजीता महापात्र. यांनी करून दिली. या दौऱ्यासाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील इ. १२ वी विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना इस्त्रोच्या शास्त्रज्ञाची भेट घेण्याची संधी उपलब्ध करुन देत अनोखी भेट दिली. भारताने चांद्रयान -३ चे यशस्वी सॉफ्ट लॅडींग चंद्राच्या दक्षिण धृवावर करुन जगामध्ये इतिहास निर्माण केला. दक्षिण धृवावर सॉफ्ट लॅडींग करणारा भारत हा जगातील एकमेव देश ठरला आहे. यामुळे देशात सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. त्याचा अनुभव आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मिळावा. विद्यार्थ्यामध्ये विज्ञानाविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी यासाठी आश्रमशाळेतील विद्यार्थी इस्त्रोला भेट देणार आहेत. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. डहाणू अंतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील २६ विद्यार्थी इस्त्रो सेंटर व बँगलोर दर्शन करण्यासाठी ...पान ६ वर

# पालघर येथे सर्व संघटनांच्यावतीने संविधान दिन साजरा



**पालघर/प्रतिनिधी**

संपूर्ण भारत देश संविधान दिन साजरा करीत असताना भारतीय संविधानाचे महत्त्व तसेच जनसामान्य लोकांना दिलेल्या मूलभूत अधिकाराची जाणीव व्हावी या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे रविवार २६ नोव्हेंबर २०२३ रोजी रिपाई (आ), महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना, राष्ट्रीय बंजारा टायगर्स यांच्या वतीने पालघर शहरात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. २६ नोव्हेंबर १९४९ हा भारतीय इतिहासातील खूप मोठा दिवस आहे या दिवशी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाची राज्यघटना भारत देशाच्या स्वाधीन केली हा दिवस संविधानाचा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो त्या अनुषंगाने पालघर शहरात आयोजकांच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाला मानवंदना देऊन सामूहिकरीत्या संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणात संविधानाचे महत्त्व काय आहे ते जनतेला सांगून शुभेच्छा दिल्या. तसेच २६ नोव्हेंबर २०१८ रोजी आपल्या भारत देशातील मुंबई येथे अतिरेक्यांनी जो भ्याड हल्ला केला त्या हल्ल्यात आपले वीर जवान, पोलीस व नागरिक हे शहीद झाले. त्यांना पालघर पोलीस ठाणे येथे जाऊन सामूहिक रित्या भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. यावेळी पालघर शहराच्या प्रथम नागरिक डॉ.उज्वला काळे (नगराध्यक्ष -पालघर नगर परिषद) केदार काळे, महाराष्ट्र - राज्य प्रवक्ते (शिवसेना शिंदे गट), कुंदन संखे जिल्हाध्यक्ष पालघर शिवसेना (शिंदे गट), दत्तात्रेय किंद्रे पोलीस निरीक्षक (पालघर पोलीस स्टेशन), भावानंद संखे (गटनेता भाजप), तथा (नगरसेवक पानप) प्रवीण मोरे (नगरसेवक) मनोज घरत (शिवसेना नेते) प्रकाश कुराडे (सामाजिक कार्यकर्ते) नैवेद्य संखे पालघर शहर अध्यक्ष (शिवसेना शिंदे गट) डॉ. नारायणकर सरिता ठाकूर पालघर शहर उपसंघटक ...पान ६ वर

# वाडा तालुक्यातील शेतकरी, कामगार, शेतमजूरांच्या प्रश्नांसंदर्भात माकपचा भव्य मोर्चा व ठिय्या आंदोलन



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील शेतकरी, कामगार ‘शेतमजूर, विद्यार्थी व सर्वसामान्यांचे अनेक प्रश्न व समस्या असून याबाबत शासन स्तरावर कुठल्या प्रकारची उपाययोजना होत नसल्याने सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे. त्यातच देशातील श्रमिक जनता मोदी सरकारच्या शेतकरी, कामगार, शेतमजूर व जनताविरोधी आणि कॉर्पोरेटधर्जिण्या धोरणामुळे त्रस्त आहे व त्यामुळे जनता मेटाकुटीला आली असून, महागाई, बेरोजगारी, विषमता यामुळे सर्वसामान्य जनता अक्षरशः भरडली जात आहे. हीच परिस्थिती देशात, राज्यात. जिल्ह्यात व वाडा तालुक्यात आहे. या बाबत भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) तसेच अखिल भारतीय किसान सभा, जनवादी महिला संघटना, डी.वाय.एफ.आय. एस.एफ.आय च्या वतीने मंगळवारी (दि.२८ नोव्हेंबर) वाडा उपविभागीय कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन केले होते. सदरचा मोर्चा किरवली, खंडेश्वरीनाका, मुख्य बजारपेठ, भाजी मार्केट, आगरआळी, तहसील कार्यालय मार्गे उपविभागीय कार्यालय येथे धडकला व येथे ठिय्या आंदोलन करून शासना विरोधात घोषणा दिल्या. वनाधिकार कायद्याची त्वरीत काटेकोरपणे अंमलबजावणी करा., तालुक्यातील रोजगार हमी योजनेची कामे त्वरीत सुरू करून मंजूरांना रू.६००/- मजूरी दर द्यावा, म.रा.वि.वि. कंपनीकडून बेसुमार वीज बिलाची आकारणी करून होणारी ग्राहकांची लूट व ग्राहकांना नोटीसी बजावून ग्राहकांना होणारा त्रास त्वरीत बंद करा तसेच मागेल त्याला वीज मीटर द्यावा तसेच सडलेल्या, गंजलेल्या वीजेचे पोल, गंजलेल्या, सडलेल्या तारा त्वरीत ...पान ६ वर

# नालासोपाऱ्यात अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या सीरियल रेपिस्टच्या मुसक्या आवळल्या!

## दोन विकृतांपैकी एकाला उत्तर प्रदेशातील वाराणसी येथून अटक



**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपारा शहरात अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या दोन विकृतांपैकी एका आरोपीला गुन्हे शाखा ३च्या पथकाने उत्तर प्रदेशातील वाराणसी येथून अटक केली आहे. त्यांची माहिती देणाऱ्यास पोलिसांनी बक्षिस जाहीर केले होते. विकृतांच्या या कृत्यामुळे पालक धास्तावले होते. नालासोपारा शहरात गेल्या काही दिवसांपासून अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या विकृतांची दहशत पसरली होती. त्यापैकी ९ ऑक्टोबर आणि १५ नोव्हेंबर रोजी दोन वेगवेगळ्या प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले होते. या दोन्ही आरोपीची छायाचित्रे पोलिसांनी प्रसिध्द करून त्यांची माहिती देणाऱ्यास बक्षिसही जाहीर करण्यात आले होते. या दोन्ही विकृत आरोपींच्या शोधासाठी स्थानिक पोलिसांच्या पथकांसह गुन्हे शाखेची ३ पथके स्वतंत्रपणे तपास करत होती. यातील एक आरोपी उत्तर प्रदेश मध्ये असल्याची माहिती गुन्हे शाखा ३ च्या पथकाला मिळाली होती. उत्तर प्रदेश पोलिसांच्या विशेष तपास पथकाच्या (एसटीएफ) मदतीने वाराणसी येथील केंट रेल्वे स्थानक परिसरातून अटक केली. विशाल कनोजिया असे या आरोपीचे नाव आहे. तो नालोसापारा येथील राहणारा असून संगणाकाचे सुटे भाग विक्रीचा व्यवसाय करतो. १५ नोव्हेंबर रोजी नालासोपारा येथील ९ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करून पळून गेला होता. आरोपी कनोजिया याला रविवारी सुट्टीच्या न्यायालयात हजर करून सोमवारी वसईत आणले जाणार आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांनी दिली. पोलिसांकडून दुर्सय़ा विकृत आरोपीचा शोध सुरू आहे.

# राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरु होणार



**मुंबई/प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे गुरुवार दि. ७ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत होणार आहे. विधानभवन येथे आज विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. यावेळी नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा झाली. या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विविध विभागाचे मंत्री, दोन्ही सभागृहाचे सदस्य, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे संबंधित मान्यवर उपस्थित होते. हिवाळी अधिवेशन गुरुवार दि ७ डिसेंबर २०२३ ते बुधवार दि.२० डिसेंबर २०२३ या कालावधीत घेणार आहे. हिवाळी अधिवेशनाचे एकूण दिवस १४ असून, यामध्ये प्रत्यक्ष कामकाज १० दिवस, तर सुट्या (शनिवार व रविवार मिळून) ४ दिवस आहेत.

# भिवंडी ग्रामीण वीज ग्राहकांसाठी टॉरेंट पॉवर आयोजित संवाद शिबिरास ग्राहकांचा प्रतिसाद




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहर व ग्रामीण भागात वीज वितरण व वीज बिल वसुली करणाऱ्या टोरंट पॉवर कंपनी व्यवस्थापना कडून वीज ग्राहकांच्या समस्या सोडवणुकीसाठी कशेळी येथे गुरुवारी आयोजित केलेल्या संवाद शिबिरात असंख्य वीजग्राहकांना सहभागी होत प्रतिसाद दिला आहे. टोरेंट पॉवरचे कंपनीचे उपाध्यक्ष स्नेहल देसाई, महाव्यवस्थापक अरुण राव, अंकित साहा, बिनु सेतुमाधवन, विजय राणे, जनसंपर्क अधिकारी चेतन बदियानी व इतर वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या या शिबिरात २०० वीज ग्राहकांनी सहभागी होत आपल्या समस्या मांडल्या असता टोरंट पॉवर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या समस्यांचे तातडीने निवारण केले. त्यासोबत कायम स्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या वीज ग्राहकांची विशेष व्याज माफी योजना, प्रलंबित वीज जोडणी, भरारी पथकाच्या कारवाया, बिला संबंधितील तक्रारी व डिजिटल वीज बिल सेवा यासारख्या मुद्द्यांवर ग्राहकांना माहिती देण्यासाठी जागरूकता निर्माण मोहीम म्हणून देखील या प्रसंगाचा वापर केला.यापूर्वी टोरेंट पॉवर कंपनीने भिवंडी शहरात सप्टेंबर महिन्यात गोपाल नगर आणि मिल्लत नगर येथे सुध्दा अशाच संवाद शिबिराचे आयोजन केले होते त्यामध्ये सुमारे दोन हजार हून अधिक वीज ग्राहक सहभागी झाले होते.

# उल्हासनगरात शुल्लक कारणावरून बाप आणि लेकावर जीवघेणा हल्ला

**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगर कॅम्प क्रमांक पाच भागातील स्वामी शांती प्रकाश आश्रम रोडवर असलेल्या संतोष इलेक्ट्रॉनिक दुकानात २ जण वस्तूंची देवाण घेवाण करण्यासाठी आले होते, तेव्हा करण सुखेजा येथे बसला होता. दुकानातून घेऊन गेलेला सामान बदलायला दोन व्यक्ती दुकानात आले. दुकानातील करणने पाच मिनिटे थांबा असे सांगितले. त्यामुळे संतापलेल्या दोन्ही तरुणांनी करणशी झटापट सुरू केली, एवढेच नाही तर दुकानासमोरून दुकानावर दगडफेक करून हल्लाही केला. दुकानासमोर ठेवलेल्या काचेच्या सहाय्याने हल्लेखोरांनी करणवर काचेच्या साह्याने जीवघेणा हल्ला केला. हे सर्व पाहून करणचे वडील त्यांना मदत करायला गेले असता त्यांनी त्यांनाही मारहाण करण्यास सुरुवात केली.या हल्ल्यात करण गंभीर जखमी झालंय, करणला खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून. हिललाइन पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दोन हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे, पोलीसानी हल्लेखोरांचा शोध सुरू केला असून त्यांना लवकरच अटक करण्यात येईल असे सांगितले.

# मोहम्मदी चॅरिटेबल ट्रस्ट व लायन्स क्लबची आदिवासींसोबत देव दिवाळी साजरी



**वसई/प्रतिनिधी**

नॅशनल असोसिएशन ऑफ लायन्स क्लब, लायन्स क्लब ऑफ वसई रोड माणिकपूर आणि मोहम्मदी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ समाजसेवक हबीबभाई पटेल यांच्या हस्ते वनवासी (आदिवासी) कुटुंबासोबत देव दिवाळी मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. उल्लेखनीय आहे की, गेल्या २५ वर्षांपासून ज्येष्ठ समाजसेवक ट्रस्टचे अध्यक्ष हबीब पटेल हे देव दिवाळीनिमित्त गरजू आदिवासींना धान्य, कपडे, मिठाईचे वाटप करत आहेत. दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील मंगळवार २९ नोव्हेंबर २०२३ रोजी मिठाई, धान्य, कपडे आणि स्वयंपाकघरात वापरल्या जाणार्या सर्व खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले. यामुळे स्थानिक संस्थांसह ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला व सामाजिक कार्यकर्ते हबीब मोहम्मद पटेल यांचे आभार मानले. कार्यक्रमात पालघर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार बळीराम जाधव यांनी संबंधित संस्थांचे आभार मानताना समाजसेवक हबीब पटेल यांनी चालवलेले असे धार्मिक कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की मी गेली अनेक वर्षे या कार्यक्रमाला हजेरी लावत आहे. अन्य अनेक कार्यक्रमांना मी हजेरी लावली आहे पण पटेलांनी आमच्या आदिवासी बांधवांसोबत आयोजित केलेल्या या कार्यक्रमात मला खूप आनंद वाटतो. काही भाग गरजूंसाठी दान करत आहे. सुमारे ३०० आदिवासी कुटुंबांना डाळी, तांदूळ, बेसन, गोड तेल, पापड, साखर, मशाल, साड्या आदींचे वाटप करण्यात आल्याचे सांगण्यात आले.कार्यक्रमादरम्यान ठाणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पीडीजी लायन चंद्रशेखर घाग व बहुजन समाजाचे ज्येष्ठ नेते डॉ. विकास आघाडी.नेते काशिनाथ पाटील, सरस्वती विद्यालयाचे संस्थापक डी.के.पाटील, माजी नगरसेविका अधिवक्ता अंजली पाटील, मोहम्मदी चॅरिटेबल ट्रस्टचे इम्रान हबीब पटेल, लायन्स क्लब वसई रोड माणिकपूरचे अध्यक्ष राजेश पाटील, सचिव धर्मेंद्र ठाकूर, खजिनदार आरती ठाकूर, शेरबानो हबीब पटेल, खजिनदार हबीब पटेल आदी उपस्थित होते. आदिवासी कुटुंबे उपस्थित होते.

